2023-24

# जगाचं ज्ञानपीठ
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर



संपादन
**प्रा. अशोककुमार दवणे**

- ISBN : 978-93-85115-58-5
- प्रकाशन क्र: ९११

  Jagach Dnyanpith

  Dr. Babasaheb Ambedkar
- **जगाचं ज्ञानपीठ**
  **डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
  संपादन :
  प्रा. अशोककुमार दवणे
- **प्रकाशक :**
  प्रा. अशोककुमार दवणे
  शब्ददान प्रकाशन
  सवितानगर, तरोडा (खु), नांदेड.
  मो. 9890381958.
  Email : ashokkumardawane@gmail.com


- **सर्वाधिकार :** प्रकाशकाधीन


- **प्रथमावृत्ती :** २४ ऑक्टोबर २०२३
  धम्मचक्र प्रवर्तन दिन
- **मुद्रक :**
  रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद.
- **अक्षरजुळवणी :**
  श्री कॉम्प्युटर्स, कैलासनगर, नांदेड.
- **मुद्रितशोधक :** चंद्रप्रकाश गायकवाड, नांदेड.
- **मुखपृष्ठ :** संतोष घोंगडे, पुणे
- किंमत : ६०० रू.

## अनुक्रमणिका


- अभिप्राय ........ ०९
- संपादकीय ........ ११

१. असे होते आपले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ........ १३
नानकचंद रत्तु, दिल्ली (अनुवादक: एन. एम. वाघमारे,पनवेल)

२. स्वतंत्र मजूर पक्ष आणि मुंबई विधानसभा ........ १८
न्या. आर. आर. भोळे, मुंबई (अनुवादक: प्र. श्री. नेरुरकर, मुंबई)

३. नागपूरचे धर्मांतर ........ २९
बळवंत हणमंतराव वराळे, धारवाड (कर्नाटक)

४. भारताचा उद्धारकर्ता महात्मा ........ ३८
प्र. के. अत्रे, मुंबई

५. डॉ. आंबेडकर देशाच्या 'लाईफ लाईन' च्या सिद्धान्ताचे जनक ........ ४४
ॲड. प्रकाश आंबेडकर, मुंबई

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संस्कृती ........ ४८
प्रा. डॉ. यशवंत मनोहर, नागपूर

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महान ग्रंथ 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' ...... ५६
प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे, औरंगाबाद

८. डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन ........ ६०
डॉ. नरेंद्र जाधव, मुंबई

९. सामाजिक न्याय ........ ७३
ई. झेड. खोब्रागडे, नागपूर

१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद ........ ७८
प्रा. डॉ. प्रदीप आगलावे, नागपूर

४३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: व्हाइसरॉयच्या का. परिषदेचे कामगार मंत्री .. ३१३
प्राचार्य ब्रळीराम गायकवाड, उरण, नवी मुंबई
४४. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बालपण व शिक्षणातून .......... ३१६
प्रा. अरुण बुंदेले, अमरावती
४५. क्रांती–प्रतिक्रांती आणि मुक्ती आंदोलनाची दिशा .......................... ३२२
प्रा. डॉ. शुद्धोधन कांबळे, अर्जापूर, ता.बिलोली
४६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कामगार चळवळ ............................ ३२९
मोगल जाधव, पुणे
४७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे तीन गुरु ............................ ३३७
शत्रुघ्न लोणारे, नागपूर
४८. बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर: एक प्रतिभावंत विविज्ञ ..................... ३४८
भीमराव सरवदे, औरंगाबाद
४९. प्रखर विज्ञाननिष्ठ डॉ.बाबासाहेब आंबेडकर .................................. ३५९
अरुण वाघ, मुंबई
५०. माणगाव परिषद: राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ३६३
भीमराव परघरमोल, अकोला
५१. जगाचं ज्ञानपीठ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर .................................. ३६७
प्रा. अशोककुमार दवणे, नांदेड



## अभिप्राय...

आधुनिक काळातील विसावं शतक हे डॉ. बाबासोहब यांच्या कर्तृत्वानं आणि विचारांनी तेजोमय झालंय! विसाव्या शतकात जन्माला आलेल्या या महान विद्वान आणि क्रांतिकारक महापुरुषांचा विसावं, एकविसावं शतकच नव्हे, तर यापुढंदेखील अनेक शतकांवर त्यांच्या विचारांचा प्रभाव राहणार आहे.

[illegible]. मानवी अधिकारांपासून वंचित असलेला समाज स्वाभिमानानं ताठ उभा राहून माणूस म्हणून जगू लागला. हे परिवर्तन भारतीय समाजात घडून आले ते केवळ आणि केवळ डॉ. आंबेडकरांमुळे! या देशात बाबासाहेब झाले! हे स्वप्न तर नाही ना ? असं वाटू लागतंय! पण हे स्वप्न नाहीयं!

जागतिक ख्यातीप्राप्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाशझोत टाकणारा 'जगाचं विद्यापीठ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा ग्रंथ खूप महत्त्वाचा दस्तावेज आहे. या ग्रंथाचे संपादन, साहित्यिक आणि चिंतक प्रा. अशोककुमार दवणे यांनी केले आहे. या ग्रंथात महाराष्ट्रातील अभ्यासक, विचारवंत आणि लेखक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवर लेख लिहिले आहेत. ग्रंथाच्या अनुक्रमणिकेवरून प्रस्तुत ग्रंथाची व्यापकता वाचकांच्या लक्षात येते.

प्रस्तुत ग्रंथांसाठी सर्व क्षेत्रांतील मान्यवर आणि अभ्यासू असलेल्या लेखक, संशोधक आणि लेखकांनी लेख लिहिले आहेत. ही या ग्रंथाची जमेची बाजू आहे. बाबासाहेबांच्या जीवनातील विविध पैलूंवर एकूण ५१ लेखकांनी लेख लिहिले आहेत. लेखांच्या विविध विषयांवरून नजर फिरविली तरी बाबासाहेबांच्या कर्तृत्व आणि विचारांचा हिमालय लक्षात येतो. डॉ. आंबेडकर हे ज्ञानाचे प्रतीक आहेत. बाबासाहेब हे ज्ञानाचं विद्यापीठ होते. म्हणून या ग्रंथाचं 'जगाचं ज्ञानपीठ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हे शीर्षक अतिशय समर्पक आहे.

प्रा. अशोककुमार दवणे यांना संपादनाचा भरपूर अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी १० ग्रंथांचे संपादन केले आहे. त्यांची स्वत:ची एकूण ३८ पुस्तके आहेत. यात २४ कवितासंग्रह, ८ चरित्र, ३ एकांकिका, १ ललितसंग्रह आणि २ बौद्ध धम्मविषयक ग्रंथ संपदा आहे. अशा अनुभवसंपन्न आणि साहित्याच्या विविध प्रकारांत लेखन करणाऱ्या साहित्यिक प्रा. अशोककुमार दवणे यांच्या चिंतक आणि चौकस दृष्टिकोनातून या ग्रंथाचे संपादन झालंय! प्रस्तुत ग्रंथ विद्यार्थी, संशोधक आणि सर्वसामान्य वाचकांसाठी अतिशय महत्त्वपूर्ण दस्तावेज ठरणार आहे. साहित्यिक, प्रकाशक, संपादक प्रा. अशोककुमार दवणे यांचे खूप खूप अभिनंदन!

**प्रा. डॉ. प्रदीप आगलावे**
सदस्य सचिव,
डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती,
महाराष्ट्र शासन, मुंबई.

संस्कृतीत स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. मनुस्मृतीचे कायदे [illegible] जाचक होते; पण हे अन्यायी कायदे महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी [illegible] बदलविले. प्रज्ञावंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा ज्योतिराव फुले यांना गुरू मानले. स्त्रियांच्या हक्कावर आणि स्वातंत्र्यावर अंकुश असणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले की ज्यामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर गदा आणली होती.

१८४८ साली मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा काढून स्त्रियांसाठी शिक्षणाचा [illegible] मोकळा करून देणारे महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे कार्य अवर्णनीय आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या कलम २९ नुसार प्रत्येक स्त्रीला शिक्षणाचा मूलभूत अधिकार बहाल केला. एवढेच नव्हे, तर घटनेच्या कलम २५ नुसार धर्म स्वातंत्र्याचा व धार्मिक विधीत सहभागी होण्याचा स्त्री–पुरुषांना समान अधिकार बहाल केला आहे. आणि म्हणूनच आज फुले, आंबेडकर यांच्या महान कर्तृत्वामुळेच भारतीय स्त्री राष्ट्रपती, पंतप्रधान यासारख्या देशातील सर्वोच्च पदावर विराजमान आहे. आज सर्वच ठिकाणी उत्तुंग प्रगती साध्य करीत आहे. स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुरुषाबरोबर काम करीत आहे. ही महिलांची प्रगती अनन्यसाधारण आहे. स्त्री आज वैज्ञानिक क्षेत्रात अंतराळामध्ये झेप घेते आहे. आकाशात भरारी घेताना दिसत आहे आज भारतीय स्त्रियांना स्वातंत्र्याचे द्वार उघडून देणाऱ्या महामानवासमोर स्त्रियांनी कृतज्ञतेने नतमस्तक व्हायला पाहिजे. आजच्या स्त्रिया शिक्षित असून धार्मिक कर्मकांडात मग्न आहेत असे चित्र दिसते ? मात्र स्त्रियांना भरीव काम करण्याची गरज आहे. तळागाळातील स्त्रियांना अधिकाराची जाणीव करून देणे गरजेचे आहे. आज सर्व स्तरांतील स्त्रियांना एकत्र आणण्याची गरज आहे. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून कायदा केला. स्त्रियांना अधिकार प्राप्त करून दिला, त्यामुळे स्त्रियांतील परिवर्तन हे या महामानवामुळे होऊ शकले.

संदर्भसूची :

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल ( रत्नाकर गणवीर)
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बिल. (डॉ. सुभाष खंडारे)
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ ( महाराष्ट्र शासन, मुंबई)



# कृष्णाजी केळुसकर गुरुजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. राज ताडेराव**
फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग

## प्रास्ताविक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनेक महत्त्वपूर्ण व्यक्तींचा सहवास लाभला आहे. हा सहवास त्यांना नेहमीच प्रेरणादायी आणि आत्मबल वाढविणारा, त्याचप्रमाणे नवचैतन्य निर्माण करणारा ठरला आहे. त्यातीलच एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री कृष्णाजी अर्जुन केळुसकर गुरुजी होत. केळुसकर गुरुजी हे सामाजिक जाण असलेले व्यक्तिमत्त्व होते. ज्या काळात आपल्या देशात जातीयतेचे स्तोम माजले होते. ब्रिटिशांनी सर्व जाती धर्मातील व्यक्तींना शिक्षणाचा अधिकार देऊन त्यांना सन्मानाचे स्थान दिले, अनेक समाजसुधारकांनी जातियता हा मानवतेला लागलेला कलंक आहे. त्यामुळे राष्ट्राची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. हे ओळखून समाजातील जातीयतेच्या बेडी तोडण्यासाठी समाजाचे प्रबोधन केले. तरीही समाजात अस्पृश्यता मोठ्या प्रमाणात पाळली जात होती. अस्पृश्यांना त्यांच्या मौलिक अधिकारापासून वंचित ठेवल्या जात होते. त्यांची सावलीसुद्धा विटाळ मानली जात होती. अशा काळात केळुसकर गुरुजी यांनी कधीही जातीपातीचा द्वेष केला नाही. तर संपूर्ण बहुजनांना एकत्रित करण्यासाठी समाजातील नीतीबोधाच्या गोष्टी एकत्र करून समाजाचे प्रबोधन केले. समाजाला संघटित व जागृत करण्याचे काम त्यांनी केले. कारण बहुजन समाजातील अन्यायग्रस्त, शोषित, वंचित, दुर्बल, शूद्र, अतिशूद्र यांच्या संवेदना जाणून घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना झाल्या पाहिजेत. अशा प्रकारचे त्यांचे विचार होते.

अस्पृश्यांनासुद्धा सन्मानाने, माणूस म्हणून जीवन जगून प्रगतीच्या शिखरावर जाता आले पाहिजे. त्यांना त्यांचा गौरवशाली इतिहास माहीत असला पाहिजे. यासाठी केळुसकर गुरुजी यांनी प्रचंड ग्रंथनिर्मिती केली. अनेक तत्कालीन ग्रंथांवर टीका टिप्पणी केली. ही टीका पुढे पुस्तकरूपानेही प्रसिद्ध झाली आहे. भारतात पराकोटीची अस्पृश्यता असतानाही एका अस्पृश्य विद्यार्थ्यांना जवळ घेऊन त्याला मोलाचे मार्गदर्शन करणारे केळुसकर गुरुजी होते. त्यांनी शेवटपर्यंत बाबासाहेब आंबेडकर यांना साथ दिली. केळुसकर गुरुजींच्या प्रयत्नामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जाऊ शकले.

## केळुसकर गुरुजींचे पूर्ववृत

केळुसकर गुरुजी यांचा जन्म २० ऑगस्ट १८६० रोजी कोकणातील केळुस ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. त्यांनी जवळपास ४८ ग्रंथांचे लेखन केले आहे. परंतु त्यातील केवळ २१ ग्रंथ उपलब्ध झाले आहेत. त्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र

झाली. या संदर्भात श्री केळुसकर गुरूजी यांनी 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर' या शीर्षकाखाली १९३२ एप्रिलच्या 'जनता' या खास अंकात लिहिलेल्या लेखात सांगितले आहे की, ज्यावेळी बाबासाहेब मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. तेव्हा त्यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांच्या काही ज्ञाती बांधवांनी एक सभा परळच्या बाजूला केली होती. त्या सभेला मी जाऊन दोन अभिनंदनपर शब्द बोललो होतो. सभा आटोपल्यानंतर बाबासाहेबांचे वडील रामजी सुभेदार पेन्शनर यांच्याकडे जाऊन मी म्हटले की, 'तुमचा हा मुलगा फार बुद्धिमान व तेजस्वी आहे. त्याला पुढचे कॉलेजातील शिक्षण आवश्यक द्या.' तेव्हा ते म्हणाले की, 'मला नुसते ५० रू. मासिक पेन्शन मिळते. एवढ्याने माझे व माझ्या कुटुंबाचे भागत नाही. तेव्हा याच्या शिक्षणाला मी कुठून पैसे आणू?' तेव्हा मी त्यांना म्हणालो, 'मी बडोद्याचे राजे श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराज यांच्याकडून काही मदत मिळून दिल्यास आपण याला कॉलेजात पाठविण्यास तयार व्हाल का?' सुभेदारांनी होय म्हटल्यानंतर मी बाबासाहेबांना नीटनेटका पोशाख करून महाराजांच्या भेटीस नेले आणि त्यांचे दर्शन घेऊन मी महाराजांना टाऊन हॉलमध्ये नुकतेच केलेल्या भाषणाची आठवण करून दिली. आणि म्हटले महाराजांनी असे अभिवचन दिले आहे की, "अस्पृश्य वर्गापैकी लायक विद्यार्थी मिळाल्यास आपण त्याला उच्च शिक्षणासाठी आवश्यक ती मदत करू!" तेव्हा मी आपणाकडे असा लायक विद्यार्थी महार जाती संघापैकी आणला आहे. तो नुकताच मॅट्रिक झाला आहे. त्यांचे वडील लष्करात सुभेदाराच्या हुद्द्यावर पोहोचून पेन्शन घेऊन घरी बसले आहेत. आपली आज्ञा होत असल्यास त्याला आपल्या दर्शनास आणतो. या गोष्टीचा महाराजास मोठा संतोष वाटून त्यांनी मला त्यास घेऊन येण्याविषयी आज्ञा केली. त्यावेळी बाबासाहेबांना महाराजांपुढे नेऊन उभे केले. त्यावेळी इंदूप्रकाश छापखान्याचे मालक दामोदर शेठ येंदे हे तिथे हजर होते. महाराजांनी बाबासाहेबांना काही प्रश्न विचारले. त्याची त्यांनी समर्पक उत्तरे दिली. ती ऐकून महाराज खूश झाले व कॉलेजला जाऊन उच्च शिक्षण घेण्यासाठी दरमहा रुपये २५ ची शिष्यवृत्ती देण्याचे अभिवचन दिले.

त्यानुसार उच्च शिक्षणासाठी ३ जानेवारी १९०८ रोजी बाबासाहेबांचे नाव मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजात प्रीव्हियसच्या वर्गात दाखल केले. कॉलेजमध्ये गेल्यावर बडोद्याची दरमहा रुपये २५ स्कॉलरशिप त्यांना मिळाली. त्यामुळे बाबासाहेबांना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव झाली. बाबासाहेब ज्युनिअर बी.ए. च्या वर्गात होते तेव्हापासून व सुभेदार रामजी आंबेडकर व केळुसकर गुरुजी यांनी नियमितपणे बाबासाहेबांनी अभ्यास करावा याबाबत परोपरीने प्रयत्न केले. केळुस्कर गुरुजी यांनाही बाबासाहेबांनी बी.ए. पास व्हावे याबद्दल तळमळ वाटत असे. जानेवारी १९१३ मध्ये बी.ए. चा निकाल लागला. त्यात बाबासाहेब बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यावेळी केळुसकर गुरुजीप्रमाणे सर्वांनाच आनंद झाला. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी तर निकाल ऐकल्याबरोबर ते बाजारात गेले व त्यांनी पाच रुपयांचे पेढे म्हणून सर्वांना वाटले.

बी.ए. ची पदवी हाती पडल्यानंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्यांनी मला आर्थिक साहाय्य केले त्या बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड महाराजांची मी नोकरी करावी व



म्हणूनवरील बडोदे सरकारचे ऋण फेडण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर यांना वाटले व त्यानुसार त्यांनी काही काळ बडोदा संस्थानात नोकरी केली. परंतु मध्येच २ फेब्रुवारी १९१३ रोजी सुभेदार रामजी यांचे निधन झाल्यामुळे त्यांना ती नोकरी सोडावी लागली. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उच्च शिक्षणासाठी मदत करण्याची शिफारस केळुसकर गुरुजींनी केली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस जाऊ शकले. बाबासाहेबांच्या विद्यार्थीदशेतला अडचणीचा जीवनक्रम, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अस्पृश्य म्हणून वाट्याला आलेले कटू अनुभव, खडतर जीवन त्यांच्या वाट्याला आले त्याचे मार्मिक, हृदयस्पर्शी दर्शन केळुसकरांनी 'भीमराव रामजी आंबेडकर' या शीर्षकाखालील लेखात लिहिले.

**गौतम बुद्ध चरित्राचा बाबासाहेबांच्या जीवनावर झालेला प्रभाव :**

श्री कृष्णाजी केळुसकर गुरुजी लिखित गौतम बुद्धाचे चरित्र या ३१० पृष्ठांच्या ग्रंथामुळे बाबासाहेबांना बुद्ध चरित्राची जाणीव तर झालीच शिवाय त्यांची धर्मविषयक चिकित्सक बुद्धी जागृत झाली. कारण, या ग्रंथात केळुसकर गुरुजी यांनी बुद्धांचे धर्म विचार, नीती विचार, बुद्ध धर्माचा आजपर्यंतचा इतिहास, गौतम बुद्धाच्या धम्माचे आमच्या देशावर व ख्रिस्ती वगैरे इतर राष्ट्रांवर कोणकोणते परिणाम झाले. त्याचप्रमाणे भारतात जातिभेदाचे जे प्रचंड बंड माजले होते. त्याला बुद्धाच्या उपदेशामुळे प्रतिकार होऊन ते बरेच कमी झाले. इत्यादी महत्त्वपूर्ण बाबींवर प्रकाश टाकलेला आहे. त्याचप्रमाणे वैदिक धर्मातील यज्ञयाग, पुरोहितशाही, पशू हिंसा यांच्याविरोधात बुद्धांनी मांडलेले तत्त्वज्ञान त्याचप्रमाणे या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केळुसकर गुरुजी यांनी "एका ख्रिस्ता–खेरीज दुसरा कोणीही या महात्म्याच्या योग्यतेचा पुरुष या भूतलावर आजपर्यंत निर्माण झाला नाही. हे असे अलौकिक नररत्न आमच्या या भारतभूमीमध्ये निर्माण झाले असता त्याची काहीच माहिती आम्हास नसावी; व ती प्राप्त करून घेण्याविषयीची इच्छा आमच्या मनात उत्पन्न होऊ नये, ही मोठी शरमेची गोष्ट आहे. आमच्या देशातील लोकांच्या ठायी आमच्या पुरातन गोष्टीविषयी बेसुमार उदासीनता वास करीत आहे. त्यामुळे आमची खरी योग्यता आम्हास कळेनाशी झाली आहे. आमच्या प्राचीन चांगल्या गोष्टी आमच्या ठायी योग्य प्रकारचा स्वाभिमान जागृत झाल्याने, आम्हास आमच्या सध्याच्या स्थितीची थोडीबहुत लाज वाटून स्व सुधारणा करण्याची बुद्धी आमच्यामध्ये जागृत होण्याचा संभव आहे." अशा प्रकारचे विचार मांडले आहेत.

केळुसकर गुरुजी यांनी भेट दिलेल्या गौतम बुद्ध चरित्रामुळे बाबासाहेबांच्या मनात बंडाचे निशाण रोवले गेल्याची जाणीव सुभेदार रामजी यांना झाल्याचे 'बुद्ध आणि त्याचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नमूद आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्यावेळी अमेरिकेला गेले. त्यावेळी त्यांनी बौद्ध धर्माचा बराचसा अभ्यास केला. त्यामुळे त्यांना हिंदू धर्म व बौद्ध धर्म यामधील अंतर समजले भारतातील विषमता, जातिभेद व दारिद्र्य याला कारणीभूत भारतातील ब्राह्मणशाहीच असण्याच्या निष्कर्षाप्रत

# मराठी साहित्य

## रूप आणि रंग

संपादक
डॉ. सतीश कामत

शब्दालय प्रकाशन

00320
9 788195 979257

मराठी साहित्य
रूप आणि रंग
संपादक
डॉ. सतीश कामत

● *Marathi Sahitya : Rup Ani Rang*
*Sampadak : Dr. Satish Kamat*

● मराठी साहित्य : रूप आणि रंग
संपादक
डॉ. सतीश कामत

● © सर्व हक्क सुरक्षित

● प्रकाशक
सुमती लांडे
शब्दालय प्रकाशन,
पोस्ट बॉक्स क्रमांक ९०, वॉर्ड ७,
श्रीरामपूर - ४१३ ७०९
दूरभाष: ०२४२२-२१०४२५
भ्रमणध्वनी : ९८२२००८७९६,
९८२२५२५४४४

● प्रकाशन क्रमांक : ६१५

● प्रथम आवृत्ती : जानेवारी २०२३

● मुखपृष्ठ रचना : कृष्णा माळवे

● अक्षरजुळणी :
अक्षर कॉम्प्युटर, श्रीरामपूर

● मुद्रक
समर्थ ऑफसेट, पुणे

● मूल्य : ३२० रुपये

● ISBN : 978-81-959792-5-7

'मराठी साहित्य : रूप आणि रंग' या पुस्तकातील सर्व मते आणि अभिप्राय संबंधित लेखकांचे असून त्याच्याशी संपादक, प्रकाशक, मुद्रक व वितरक सहमत व जबाबदार असतीलच असे नाही.

**email-shabdalaya@gmail.com**
**www.shabdalaya.com** **www.facebook.com/shabdalaya**
**Bookganga, Flipkart, Amazon Kindle**

या वेबसाईटवर पुस्तके व ई-बुक्स ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध

स्मृतिशेष
प्राचार्य डॉ. धनाजी गुरव
प्रा. वसंतराव भोसले
डॉ. बालाजी वाघमारे
प्रा. अरुण कासार
या 'मराठी प्राध्यापक' समूहातील मित्रांना...

## ऋणनिर्देश

डॉ. वंदना महाजन
डॉ. नीळकंठ शेरे
डॉ. विनोद कुमरे
डॉ. सूर्यकांत आजगावकर
डॉ. नानासाहेब यादव
डॉ. राजेंद्र डोंगरदिवे
डॉ. भटू वाघ
प्रा. जगदीश राणे
डॉ. संदीप कदम
डॉ. नीतिन आरेकर
डॉ. गिरीश मोरे
डॉ. सुभाष पाटील
डॉ. राजाराम राठोड
डॉ. अनिल बांगर
डॉ. भाऊसाहेब नन्नवरे
डॉ. निवृत्ती कार्वेकर
डॉ. विकास पाटील
डॉ. बाळासो सुतार

## अनुक्रम


प्रास्ताविक ७
१. नाटक : तात्त्विक स्वरूप व वाटचाल
डॉ. सुभाष पाटील ९
२. 'देवबाभळी' : मनात रुतलेल्या काट्याची वेदना
डॉ. संदीप कदम ३९
३. 'देवबाभळी' : स्त्रीमनाचे पदर उलगडणारे संगीत नाटक
डॉ. निवृत्ती कार्वेकर ५७
४. 'माझं घर' : बाईपण लादलेल्या स्त्रीचे जीवन चितारणारे नाटक
डॉ. गिरीश मोरे ६६
५. ललितगद्य : तात्त्विक स्वरूप व वाटचाल
डॉ. सतीश कामत ८६
६. 'परिपूर्ति' : चिंतनगर्भ लेखांचा लालित्यपूर्ण आविष्कार
डॉ. सतीश कामत ९९
७. 'चर्चबेल' : वेदनांच्या यातनांचा डोह
डॉ. बाळासो सुतार १२५
८. मराठी कथा : स्वरूप आणि संकल्पना
डॉ.अनिल बांगर १४३
९. मराठी कथेची विकासात्मक वाटचाल
डॉ. भाऊसाहेब नन्नवरे १५७
१०. 'कथारंग': आशयाचे नवरंग उलगडणारा संग्रह
डॉ. विकास पाटील १६७
११. 'काव्यरंग' : सामाजिक बदलाची सूचक नोंद
डॉ. राजाराम राठोड १८६
लेखक परिचय २०३

# ५.

# ललितगद्य : तात्त्विक स्वरूप व वाटचाल

डॉ. सतीश कामत

**प्रास्ताविक**

Form of Literature या इंग्रजी शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून मराठीमध्ये 'वाङ्मयप्रकार' हा शब्दप्रयोग केला जातो. वाङ्मयाचे वेगळेपण व त्याचे वर्गीकरण यासाठी हे प्रकार उपयुक्त ठरतात. वाङ्मयीन व्यवहार सुलभ व्हावेत व चर्चेकरिता मदत व्हावी यासाठी हे वाङ्मयप्रकार पाडले असले तरी रसिक वाचकांतील अभिरुचीचा घटक आणि चिकित्सक वृत्ती या गोष्टीही वाङ्मय प्रकाराच्या निर्मितीस कारण ठरलेल्या असाव्यात असे वाटते. तसे नसते तर मला कविता आवडते/ आवडत नाही अथवा मला कथा आवडते / आवडत नाही, असे विधान रसिकाने केले नसते व वाङ्मयाच्या अभ्यासकांनी त्यांचा वेगवेगळे अभ्यासप्रकार म्हणून अभ्यासही केला नसता.

'वाङ्मय प्रकार' याचा अर्थ एनसायक्लोपिडिया ब्रिटानिकात "In Literature , form is the schema or structure that a writer chooses for the presentation of matter" असा दिला गेला आहे. यावरुन लेखकाने आपल्या मनातील आशयाच्या अभिव्यक्तीसाठी अंमलात आणलेला आराखडा किंवा आकृतिबंध म्हणजे वाङ्मयप्रकार होय, असे म्हणता येईल. तर वाङ्मयकोशात एखाद्या कलाकृतीचा आकार किंवा 'घाट' म्हणजे वस्तूचा विशेष लक्षणाचा आलेला प्रत्यय किंवा ज्या रचनेमध्ये अनुभवाचा किंवा एखाद्या वस्तूचा मूलस्त्रोत आकारबध्द झाला आहे अशी रचना किंवा 'बंदिशी' किंवा 'आकृतिबंध' होय. थोडक्यात 'घाट', 'रुप', 'आकार', 'आकृतिबंध', 'बंदिश' हे सर्व शब्द समानार्थी असून त्याचा अर्थ 'प्रकार' असाच होतो.

'वाङ्मय प्रकार' कसे व केव्हा निर्माण होतात, या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणे



येथे अपरिहार्य आ[illegible] आपल्या अनुभवांना विशिष्ट प्रकारात बसविणारा लेखक त्याला आलेले अनुभव कसा घेतो, कसा अभिव्यक्त करतो यावर 'वाङ्मयप्रकार' प्रामुख्याने अवलंबून असतात असे वाटते. एखादा अनुभव असा असतो की, तो तसाच व्यक्त झाल्याशिवाय त्याला आकार येत नाही. म्हणून मूळ अनुभवाचा हा आकार नेमका होऊन नेमक्या शब्दात व्यक्त करण्याचे कौशल्य लेखकाकडे असावे लागते. भावनांची उत्कटता व्यक्त करण्यासाठी 'भावकविता' हा वाङ्मयप्रकार योजावा लागतो. तर नाट्य आणि संघर्षाची बीजे मांडण्यासाठी 'नाटक' हा प्रकार उपयुक्त ठरतो. कथाबीजे संमिश्र स्वरुपाची व अनेक स्वभाव विशेषांवर प्रकाश टाकणारी असतील तर कादंबरीचा आकार घेईल. एखाद्या अनुभवात विचाराचा, माहितीचा व ज्ञानाचा घटक प्रभावी असेल तर त्याचा निबंध होण्याची शक्यता आहे. थोडक्यात अनुभव व त्या अनुभवाची प्रकृती ज्या घटकांनी बनते, ते सर्व घटक मिळून कलाकृतीचा 'घाट' किंवा 'वाङ्मय प्रकार' जन्माला येतो असे म्हणता येते. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, निबंध/ लघुनिबंध हे असेच काही वाङ्मय प्रकार आहेत. अंतरंग आणि बहिरंग म्हणजेच आशय व अभिव्यक्ती यादृष्टीने हे सर्व वाङ्मयप्रकार निश्चितपणे एकमेकापेक्षा वेगळे आहेत. या सर्वच वाङ्मय प्रकारांचा अभ्यास करणे इथे अतिव्याप्तीचे ठरेल. म्हणून येथे केवळ 'ललितगद्य' या वाङ्मयप्रकाराची संकल्पना स्वरूप जाणून घेण्याचे योजले आहे.

**ललितगद्य : संकल्पना आणि स्वरूप**

ललित साहित्याचे गद्य, पद्य आणि नाट्य असे तीन मुख्य प्रकार मानले जात असले तरी गद्य प्रकारातच 'ललितगद्य' या साहित्यप्रकाराचा समावेश करावा लागतो. १९४५ पूर्वी ललितगद्यालाच 'ललित निबंध' अशी संज्ञा वापरली जात असे. वि. स. खांडेकरांनी 'ललित्यपूर्ण भाषेत लिहिलेल्या व वैचारिक अधिष्ठान असलेल्या निबंधाला ही संज्ञा वापरली असली तरी आज त्याअर्थाने ती वापरणे योग्य नाही. काहीतरी हेतू समोर ठेवून माणूस साहित्य निर्माण करतो. हे साहित्य उद्दिष्टानुसार वारंवार बदलतही जाते. परिणामी साहित्य प्रकारांच्या व्याख्याही बदलतात. 'ललितगद्याविषयी सुध्दा ही वस्तुस्थिती कार्यकर ठरलेली दिसते. 'निबंध' या शब्दाने बंदिस्तपण सुचीत होतो व ललित गद्याला तो मान्य नसल्याने त्यास ललित निबंध म्हणजे संयुक्तिक वाटत नाही.

'ललित गद्य' या शब्दप्रयोगात 'ललित' हे विशेषण सौंदर्यशील अशा अर्थाचे आहे. त्यात 'आठवणी अनुभव', 'लघुनिबंध', 'प्रवासलेख', 'व्यक्तिचित्रे' 'ललितलेख'

हे सर्व उपप्रकार समाविष्ट असल्याचे दिसून येते. हे सर्व उपप्रकार साहित्यप्रकाराच्या कक्षा आलांडून नवे रुप धारण करीत आले आहेत. म्हणून अशा प्रकारच्या लेखनाला इंग्रजीत 'Formless Form' असे म्हटले जाते. 'आकारहीन आकाररुप' असे त्याचे मराठी वर्णन अनुराधा सावळेकर यांनी केले आहे. हे लेखन स्वभावतः मोकळे ढाकळे, मुक्त प्रकृतीचे व विस्तारशील असते. त्यामुळे या लेखनाला ठराविक साच्यात बसविता येत नाही. त्याला आकार विहीनता प्राप्त होते.

**'ललितगद्य' म्हणजे लघुनिबंधाचेच विकसित रूप**

'ललितगद्य' हा प्रकार समजून घ्यावयाचा असेल तर लघुनिबंधाचा इतिहास थोडक्यात पाहणे आवश्यक ठरते. फ्रेंच एसेतून निर्माण झालेल्या इंग्रजी पर्सनल एसेच्या आधाराने लघुनिबंध विकसित झाला. फ्रेंच लेखक 'माँतेन' ने एसेची दोन पुस्तके लिहून 'फ्रेंच एसे' रूढ केला. आकाराने लहान मुक्त शैलितील आणि हलकाफुलका असा हा एसे होता. 'मी' ने 'मी' ला चितारणे इथे अपेक्षित होते तसा प्रयत्न या लेखनात केला जात होता. पण हा प्रयत्न तितकासा यशस्वी झाला नाही. त्यामुळे हे लेखन प्राथमिक स्वरूपाच्या लघुनिबंधाकडे झुकलेले दिसते.

माँतेनच्या नंतर बेकनने हा प्रकार इंग्रजीत आणला. माँतेनच्या फ्रेंच एसेचे मूळ स्वरुप बेकनने बदलून घेतले. बेकनने आपला एसे अधिक विचारनिष्ठ व गोळीबंद केलेला दिसतो. परिणामी बेकनचे एसे वैचारिक अनुभवांनी मंडित असे झालेले दिसतात. बेकनचा एसे म्हणजे विचारांची संक्षिप्त टिपणे झाली असे जे डॉ. आनंद यादवांनी म्हटले आहे ते अगदी योग्य आहे. अनुभवाच्या अंगाने व्यक्त होणारी मानसिक स्थिती व व्यक्तिविशेष यांना या एसेमध्ये स्थान राहिले नाही. केवळ लोकव्यवहारात उपयुक्त ठरतील म्हणून असे ऐसे लिहिले गेले.

१९६८ मध्ये अब्राहमने पुन्हा माँतेनसारख्याच एसे पुन्हा इंग्रजीत आणला. बेकनपेक्षा तो वेगळा होता. या दुसऱ्या प्रवासात पुढे अनेक टप्पे निर्माण झाले. त्यात स्टीलॲडिसनचा 'पीटिॲडिकल' हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. चार्लस लॅमचा 'पर्सनल एसे' हा दुसऱ्या महत्त्वाचा टप्पा. त्यानंतर हा एसे स्वतंत्रपणे विकसित झालेला दिसतो. त्यात स्टीव्हन्सन, चेस्टरटन, ल्युकास, सेलॉक, बीअर, जे.बी. प्रीस्टले, गार्डीनर इत्यादी लघुनिबंधकाराचे योगदान महत्त्वाचे आहे.

१९२० च्या दरम्यान Personal Essay च्या संपर्काने मराठी लघुनिबंध अवतरला. त्याचे श्रेय रत्नाकर मासिक आणि गुजगोष्टीला दिले जाते. वरील पाश्चात्य निबंधकारांच्या लेखनातून प्रेरणा घेऊन वि. स. खांडेकर, ना. मा. संत, अनंत काणेकर, गो. रा. दोडके यांनी लघुनिबंध या साहित्यप्रकारात मौलिक भर



घातली लघुनिबंधसदृश्य ललितगद्यलेखन विंदा करंदीकरांनी केले आणि समकालीन लघुनिबंधाला-ललितगद्यलेखनाला त्यांनी 'नवलघुनिबंध' असे नाव सुचविले. साचेबंद लेखनाच्या मर्यादा जाणवणाऱ्या करंदीकरांनी 'नव' या विशेषणाने मुक्त होत जाणारी लेखनप्रक्रिया सूचित केली असे म्हणता येते. मित्राने मित्राशी केलेले हितगूज असे या लघुनिबंधाचे स्वरूप होते. त्यात आटोपशीरपणा होता. निवेदन शैली साधी-सोपी, सरळ आणि खेळकर होतो. विनोदी भाषेचाही वापर होत असे, आठवणी-चुटकेही या लेखनात समाविष्ट केलेले असत. थोडक्यात आकर्षक प्रारंभ आणि अनपेक्षित शेवट इ . द्वारा दैनंदिन जीवनातील जिव्हाळ्याच्या विषयांच्या अनुषंगाने सहजसंवाद घडावा असे या लेखनाचे स्वरूप होते. ही लघुनिबंधाची सर्व लक्षणे ललितगद्याला खूपच जवळची आहेत.

थोडक्यात प्रारंभी लघुनिबंधाला खूप लोकप्रियता लाभली. कालप्रवाहात नवीन जीवनदृष्टी मांडताना सहाजिकच लघुनिबंधाने वळणे घेतली. १९२८ नंतर मराठीत स्थिरावलेल्या लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार कात टाकून नवे रूप घेत आहे. वि. शं. चौगुले म्हणतात, मराठीतील लघुनिबंध ते ललितगद्य या दिशेने वाटचाल करणाऱ्या स्फूटलेखनाचे अनेकविध आयाम नंतर प्रकट झाले पुढे कोंडी फुटल्याने लघुनिबंधाचे पाणी ललितगद्याच्या पायात सर्वदूर खेळू लागल्याचे चित्र आहे. ललितगद्याचा जीवंत प्रवाह पाहिला तर तो लघुनिबंधाचाच तो आजचा विकसित टप्पा आहे असे म्हणावे लागते.

**ललितगद्यात अंतिमतः 'मी' च व्यक्त होतो**

या प्रकारातील अनुभव मोकळेपणाने व्यक्त होत असल्याने शेवटी 'मी'च त्यातून व्यक्त होत असतो. यासंदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात, ललितगद्यात आत्मनिष्ठ लेखन असते आणि मानसशास्त्रीय दृष्टीने साहित्यात व्यक्त होणारे अनुभव हे व्यापक अर्थाने 'मी' च्या जीवनातीलच असतात. हा 'मी' म्हणजे लेखक व्यक्तिमत्त्वातीलच 'मी' असतो. लेखकाच्या वास्तव आयुष्यातीलच घटील अनुभव ते 'मी' च्या मुक्त संवेदनशीलतेच्या पातळीवर चैतन्याने फूलून येतो आणि सौंदर्याच्या कळा घेऊन लघुनिबंधात अवतरतो. हे अनुभव वास्तवातील अनुभवाशी समांतर असले तरी संवादी असतात ललितगद्याचे हे वैशिष्ट्यपूर्ण आत्मलेखन किंवा 'मीत्व' हेच त्याचे अन्य गद्य साहित्यप्रकारापेक्षा वेगळेपण दाखविण्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. 'मी' त्व या लेखनाचे केंद्र आहे. 'मी' त्व आणि 'मी' त्व ज्या आधारे व्यक्त होऊ पाहते ती विषयवस्तू त्यामुळे या प्रकारचे लेखन कधी 'मी' त्वाच्या आविष्कारासाठी तर कधी विषयवस्तूंच्या अंगाने होताना दिसते त्यामुळे एक

साहित्यप्रकार म्हणून त्याचा घाट दोलायमान असतो असे अनुराधा साळवेकरांना वाटते. या 'मी' ला स्वत:विषयी आत्मियता असते. स्वतःविषयी स्वतः केलेले गाणे स्वतःशीच गुणगुणणे म्हणजे ललितगद्य होय.

'मी' ने घेतलेला अनुभव व्यक्त करण्यासाठी जी परिस्थिती अथवा वातावरणाची आवश्यकता आहे तेवढीच तिथे येते. याचाच अर्थ ललित गद्यात 'मी' चा अनुभव व्यक्त करण्यात प्राधान्य असते. 'मी' च्या आजुबाजूची परिस्थिती अथवा वातावरण टिपण्याला नव्हे. दुसरे असे की, या प्रकारच्या लेखनातील 'मी' कथा कादंबरीप्रमाणे काल्पनिक नसतो; तर तो वास्तवातील लेखक 'मी' शी नाते जोडणारा असतो.

थोडक्यात ललित गद्यातील अनुभव हे 'मी' ने युक्त असतात. 'मी' ची व्यक्तिवैशिष्ट्ये इथे आविष्कृत होतात अथवा 'मी' चा शोध घेतला जातो. यासंदर्भात डॉ. यादव म्हणतात, मी स्वतःला येणाऱ्या अनुभवांच्या आधारे स्वतःच्या मानसिक, शारीरिक व प्रत्यक्ष वर्तनातील सुसंगती शोधत असतो. म्हणजे त्या त्या परिस्थितीत मी कसा वागलो, त्या वागण्यामागचा अर्थ काय? विषयवस्तूतील घटनांचा अर्थ काय? अशा स्वतःलाच पडलेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीचा जिज्ञासायुक्त खेळ म्हणजे हे लेखन होय. 'मी' चे अनुभव तीव्र, उत्कट असल्याने यातील 'मी' ही तितक्याच तिव्रतेने, उत्कटतेने अवतरताना दिसतो. एका अर्थी ही तीव्रता, उत्कटता 'मी' ला अनुकुल अशीच असते. साररुपाने असे म्हणता येते की, ललितगद्यात आविष्कृत होणारा 'मी' हा लेखक 'मी' शी सतत संवादी असतो. हेच ललितगद्य या वाङ्मय प्रकाराचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

**ललितगद्याची इतर काही वैशिष्ट्ये**

ललितगद्याचा कल 'मीत्वा'चा अनुभव मांडण्याकडे अधिक असतो. 'मी' एखादी विषयवस्तू कशी अनुभवतो, हेच इथे महत्त्वाचे असल्याने या वाङ्मयप्रकाराला इतर काही वैशिष्ट्ये लाभली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१. कथात्मकता**

कधी कधी ललितगद्यातील 'मीत्वा'चे केंद्र निष्प्रभ होऊन विषयवस्तूचे केंद्र प्रबळ होते. अशावेळी ही मांडणी कथा या प्रकाराकडे सरकते. लेखक 'मी' ला विषयवस्तूतील गुंतागुतींचा अनुभव मांडताना असे होणे शक्य असते. अशावेळी 'मी'चा अनुभव बाजूला राहतो व सिच्युएशन मांडण्यावर भर दिला जातो. ललितगद्यातील ही कथात्मकता स्पष्ट करताना यादवांनी आपल्या 'पाणभवरे' संग्रहातील 'बहिणीचे लग्न' चे उदाहरण दिले आहे. हे गद्य कथेसारखे वाटत असले तरी ते काल्पनिक नसल्याने असे विशिष्ट गद्य कथा मानता येत नाही. थोडक्यात काहीवेळा 'मीत्व' दुय्यम स्थानी असते आणि विषयवस्तु प्रथमस्थानी वावरते अशावेळी या प्रकारच्या लेखनात कथात्मकता आढळते.



**२. काव्यात्मकता**

कोणत्याही प्रकारच्या साहित्यात 'काव्यात्मकता' हा गुण आढळू शकतो. पण हा गुण ललितगद्यात विशेषत्वाने दिसतो, कारण लघुनिबंधातून ही काव्यत्मकता फार पूर्वीपासून अवतरत आली आहे. शिवाय ललितगद्य लिहिणाऱ्या लेखकांनी गद्यात कवितेचा जेवढा पोत भरता येईल तेवढा भरला. कवितेची काही तंत्रे गद्यात आणली. ज्यांना हे साध्य झाले त्यांच्या ललितगद्यलेखनाला जातिवंत काव्याची उत्कटता आलेली दिसते. ललितगद्य लिहिताना लेखकाच्या मनात काव्याचे एक रूप दडलेले असल्याने लेखकाच्या मनातील आशयाबरोबरच काव्यरूपही अभिव्यक्त झाले आहे. कवितेतील काही सूत्रे, काही अंगे वस्तीसाठी ललितगद्यात आली असावित असा भासच अनेकदा होतो. एकंदर लेखकाच्या विचारसूत्राचा, जाणिवांचा काव्याशी फार जवळचा संबंध असतो असे म्हणता येते. विंदा करंदीकर, श्रीनिवास कुलकर्णी आदींच्या ललितगद्य लेखनातून ही काव्यत्मकता अनुभवास येते.

**३. बंदिशविहिनता**

'ललितगद्य' हा वाङ्मयप्रकारच मुळी कोणतीही 'बंदिश' न मानणारा असा आहे. प्रकृतीने तो 'ललित' असला तरी या प्रकारचे लेखन मोकळे काहीशे अघळपघळ स्वभावाचे असते. त्यामुळे हे लेखन आकृतिबंधात अडकण्याची शक्यता नसते. त्याच्या मुक्त आणि स्वैर प्रकृतिविषयी डॉ. आनंद यादव म्हणतात, विषयवस्तूच्या निमित्ताने 'मी' ने केलेला 'मीत्वा'चा स्वैर आविष्कार, मुक्त आस्वादशीलता, मोकळेढाकळे चिंतन, अनुषंगाने येणारे इतर बारिकसारिक विषय व तपशील यामुळे बंदिशविहीनता निर्माण होताना दिसते. थोडक्यात ललितगद्याला कोणत्याही साच्यांत बसवता येत नाही. त्याला ना विषयाचे बंधन ना वृत्तीचे वावडे. वि. शं. चौगुले म्हणतात त्याप्रमाणे वाचक आणि लेखक यांच्यातला तो एक कलात्मक सुखसंवाद आहे. अलिकडच्या काळातील ललितगद्य अधिकाधिक मुक्त वा स्वैर झालेले दिसते. बंदिशविहीनतेमुळे हे लेखन अधिक प्रसरणशील होऊ लागले, असे म्हणावे लागते.

**४. उत्कट अनुभव**

ज्या गोष्टीतून संवेदना निर्माण होतात ती गोष्ट अथवा विषयवस्तू अनुभवाचे एक केंद्र असते. अनुभव घेणारा 'मी' (भोक्ता) हे अनुभवाचे दुसरे केंद्र असते. म्हणजे विषयवस्तू व 'मी' यांच्याशिवाय अनुभव निर्माणच होणार नाही. अनुभवाची

ही द्विकेंद्रीय अवस्थाच ललितगद्यात खऱ्या अर्थाने अवतरत असते. कधी कधी या अनुभवाची वास्तविकता भ्रष्ट करावी लागते. तर कधी तो काल्पनिक पातळीवर रेखाटावा लागतो. अनेकदा त्याची पुनर्मांडणी अथवा नवनिर्मितीही करावी लागते. परंतु हे अनुभव जसेच्या तसेही मांडावे लागतात. म्हणजेच ललितगद्याचा कल हा 'मी' च्या अनुभवांना रेखाटण्याकडे असतो. एकाअर्थी हा अनुभव 'मीत्व'युक्त असतो. विशिष्ट प्रसंगी 'मी' कसा वागतो? कसा जगतो? त्याचा नेमका अर्थ काय? याचा 'मी' ने स्वतःला आलेल्या अनुभवाच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न येथे केला जातो. हे लेखन काहीसे चिंतनात्मक, तत्त्वज्ञानात्मक अंगाने परंतु लालित्याची पातळी न सोडता केले जाते परिणामी येथे तीव्र आणि उत्कट अनुभव अवतरताना दिसतात.

उपरोक्त गुणवैशिष्ट्यांनी मंडित ललितगद्याला काही मर्यादा स्वाभाविकपणेच पडतात. एखाद्या लेखकाने सातत्याने ललितगद्य हा वाङ्मयप्रकार हाताळला असेल तर पुढे स्वाभाविकपणे त्याच्या लेखनात तोचतोचपणा येऊ लागतो व असे लेखन स्थिरता आणि सांकेतिकता याने ग्रासले जाते. ललितगद्याचा मुख्य विषय 'मी' असल्याने केव्हातरी या 'मी' च्या व्यक्त होण्याला मर्यादा पडणे अटळ असते. शिवाय हा 'मी' पांढरपेशा, मध्यमवर्गीय समाजातच वाढलेला घडलेला असतो. त्याचे जगणे चाकोरीबाहेर कधी गेलेले नसते. या चाकोरीबध्द जीवनात विषयवस्तूवरही मर्यादा येते. म्हणजे विषयवस्तू आणि मी या दोन्ही बाजूने ही स्थिरता व सांकेतिकता येते.

नायकनिष्ठ विचार करताना असे लक्षात येते की, कथा कादंबरीत ज्या प्रमाणे सर्जनशीलतेला वाव असतो तसा वाव ललितगद्यात वाचकाला मिळत नाही. ललितगद्यातील सौंदर्यानुभव परिस्थितीसह मांडलेला असल्याने हा प्रकार वाचकाला आपल्यात सामील करून घेत नाही. त्यामुळे वाचक कथाकादंबरीकडे अधिक वळतो. परिणामी ललितगद्य लोकप्रियतेपासून दूर राहते. त्यातूनही एकप्रकारची स्थिरता व सांकेतिकता येऊ शकते. काहीवेळेला व्यावहारिक अडचणी व मानसिक दवाब यामुळे विशिष्ट अनुभव ललितगद्यातून व्यक्त करणे शक्य होत नाही.

थोडक्यात 'आत्मनिष्ठ लेखन' किंवा 'मीत्व' हेच ललितगद्याचे व्यवच्छेदक लक्षण असून बाकीची वैशिष्ट्ये ही त्याची गुणवैशिष्ट्ये आहेत. या गुणवैशिष्ट्यांसोबत वरीलप्रमाणे काही मर्यादाही जाणवतात.

**ललितगद्याचे उपप्रकार**

'ललितगद्य' ही संज्ञा म्हणजे नवसाहित्याची एक अनोखी देण होय. १९२५ ते



१९४५ या काळात जन्मलेले आणि वाढलेले 'लघुनिबंध', 'प्रवासलेख', 'आठवणी', 'व्यक्तिचित्रे', 'ललितलेख' हे सर्व प्रकार आधुनिक मराठी साहित्यात ललितगद्याचे उपप्रकार म्हणून ओळखले जाऊ लागले. या काळात कलात्मकतेचे एक मुलभूत भान आले. साहित्य आणि साहित्याचे सौंदर्यशास्त्र यांचा गंभिरतापूर्वक विचार केला जाऊ लागला. त्यातुन साहित्यप्रहाराची एक व्यवस्था आकाराला आली व उपरोक्त स्फूट प्रकारांना ललितगद्याचे उपप्रकार म्हणून मान्यता मिळाली. अशा या उपप्रकारांचा स्थूल स्वरुपात परिचय करुन घेणे आवश्यक आहे.

**१. लघुनिबंध**

'लघुनिबंध' हा ललितगद्याचा एक उपप्रकार होय. १९२६-२७ च्या आसपास वि. स. खांडेकर आणि ना. सी. फडके यांनी तो इंग्रजीतून मराठीत आणला. ललितगद्याचे स्वरूप जाणून घेण्याच्या प्रवासात लघुनिबंधाचे मूळ इंग्रजी स्वरूप प्रारंभीच आपण समजून घेतले आहे. त्यावरुन 'लघुनिबंध' ही वैचारिक निबंधाविरुध्द निर्माण झालेली प्रतिक्रीया आहे, असे म्हणता येते. विजया राजाध्यक्ष यांनी म्हटल्याप्रमाणे, वैचारिक निबंधातील काटेकोर, कोरडे लेखन लेखक वाचकांना कालांतराने नकोसे वाटू लागले. त्यामुळे स्वैरपणे, आत्मियतेने, सहजपणे व्यक्त केलेल्या अनुभवांना लघुनिबंधात महत्त्वाचे स्थान मिळाले. ते अनुभव मुख्यतः सर्वसाधारण माणसाचे होते त्याच्या लौकिक सुखदुःखाचा शोध घेणारे होते. या शोधासाठी, वैचारिक निबंधाच्या वाटेपेक्षा लघुनिबंधाचा जन्म कसा झाला असावा याची कल्पना येते.

हलका फुलका विषय, हलकी फुलकी मांडणी असे काहीसे स्वरूप लघुनिबंधाचे होते. त्यामुळे लघुनिबंध लेखनाकडे कुणी गंभीरपणे पाहिलेले दिसत नाही. विस्तारवादी काळात या साहित्यप्रकाराकडे उथळपणे अथवा सवंगपणे पाहिल्याने तो अधोगतीला लागला होता. मात्र १९५० नंतर नवलघुनिबंधाच्या स्वरुपाचा परिणाम होऊन हा लघुनिबंध गांभिर्यपूर्वक, मनःपूर्वक लिहिलेला आढळतो. यासंदर्भात गं. बा. सरदार, कुसुमावती देशपांडे, ना. मा. संत या लघुनिबंध लेखकाचे कार्य लक्षणीय स्वरुपाचे आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील इरावती कर्वे, दुर्गाबाई भागवत, मंगेश पाडगावकर, माधव आचवल, मधुकर केचे, श्रीनिवास कुलकर्णी यांचाही इथे आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांच्या लेखनाने मुक्ततेचे वळण घेतलेले दिसते साचेबंदपणा झुगारुन मुक्ततेचा ध्यास घेतलेली लेखनप्रक्रिया पुढील काळात पाहावयास मिळते.

**२. प्रवासलेख**

प्रदेश आणि प्रवासाइतकेच 'प्रवासी' या घटकाला महत्त्व असते. प्रदेश पाहणारा,

प्रवास करणारा 'मी' म्हणजे प्रवासी असल्याखेरीज प्रवासलेख जन्मास येणार नाही. म्हणजेच प्रवासलेखात लेखक स्वतः बोलतो आपले प्रवासविषयक अनुभव 'मी' च्या भाषेत मांडतो. प्रवासादरम्यान प्रदेश पाहताना 'मी' ची जी भावस्थिती आहे, जी मनःस्थिती आहे त्याला स्थळ / प्रदेशाइतकेच महत्त्वाचे स्थान असते. प्रवासलेखनात दोन प्रकारचा 'मी' व्यक्त होतो. एक लौकिक पातळीवरचा 'मी' आणि दुसरा कलात्मक पातळीवरचा 'मी' ह्या पातळ्या नेहमी बदलत असल्याने 'मी' चे स्वरूपही संमिश्र जाणवत राहते. आरंभीच्या प्रवास लेखनात स्थळ प्रदेशसापेक्ष वस्तुनिष्ठता आढळते. मात्र आता ती कमी होऊन 'मीत्वा'ला अधिक महत्त्व आले आहे. अशा लेखनात आत्मानुभुतीच्या आविष्काराला प्राधान्य दिलेले दिसते. मधुकर केचे यांनी या प्रकारचे लेखन केलेले आढळते. 'पालखीच्या संगे' यात 'मी' ने बालपणी पाहिलेली अनुभवलेली स्थळे, वास्तू, व्यक्ती, घटना त्यांच्या लेखनाचे विषय झाले आहेत. केचे यांचे कवीमन त्यांच्या लेखनात प्रकटले आहे. वासंती मुझुमदार, व्यंकटेश माडगूळकर, मधु मंगेश कर्णिक, प्र. श्री. नेरुरकर आदींनी यासंदर्भात स्फुटलेखन केलेले आढळून येते.

### ३. आठवणी अनुभव

या प्रकारात स्वतःविषयी किंवा इतरांच्या आठवणी अनुभव सांगितले जातात. इथे विषयवस्तूलाच प्रमुख स्थान दिलेले दिसून येते. 'मीत्व' येथे गौण स्थानी राहते आणि ते नम्रपूर्वक व सौजन्यपूर्वक विसर्जित केले जाते. 'आठवणी अनुभव कथन करणारा 'मी' येथे केवळ साधनमात्र राहतो. प्रस्तुत लेखनातील आठवण अथवा अनुभव सामाजिक, राजकीय किंवा सांस्कृतिक जीवनाशी संबंधीत असू शकते. नीतिमूल्ये, सुधारणाविषयक विचार, आदर्शविषयक कल्पना यांना या लेखनात महत्त्व असते. दुसऱ्याच्या आठवणी अनुभव सांगताना विषयवस्तू उठावदार व 'मीत्व' दुय्यम बनलेले दिसून येते. असे लेखन 'व्यक्तिपरिचयात्मक' झालेले आढळते. १९५० नंतर विषयवस्तू आणि 'मीत्व' एकरूप होऊन गेलेले दिसते. 'मी' च्या आयुष्यातील 'आठवणी अनुभव' सांगायचे असल्याने 'मी' च्या जीवनातील घटितांचे स्वरूप त्याला प्राप्त झाले. न. वि. गाडगीळ, मधुकर केचे यांचे लेखन यादृष्टीने विचारात घेण्यासारखे आहे.

### ४. व्यक्तिचित्रे

व्यक्तिचित्रातील विषयवस्तू अन्य व्यक्तीच असते. या व्यक्ती लेखकाला त्याच्या जीवनप्रवासात भेटलेल्या असतात. यापैकी काही व्यक्तींमध्ये कमी अधिक बदल करून लेखक व्यक्तिचित्रे रेखाटतो. येथे लेखक 'मी' ला हवे तसे बदल करण्याची



मुभा असते. त्यामुळे अशा प्रकारच्या व्यक्तिचित्रात 'मीत्व' प्रकटलेले दिसते. असे असले तरी विषयवस्तू झालेल्या व्यक्तीच्या तुलनेत 'मीत्व' गौणच असते. या लेखनातील व्यक्ती वास्तवातील वाटत असली तरी प्रत्यक्ष समाजात ती भेटेलच असे नाही. एक वैशिष्ट्यपूर्ण माणूस रेखाटणे ही लेखक 'मी' ची प्रेरणा येथे पाहावयास मिळते. काही वेळेला वास्तव जीवनातील व्यक्ती जशीच्या तशीही रेखाटली जाते. येथे विषयवस्तू झालेल्या व्यक्तीला कसे रेखाटले गेले ते महत्त्वाचे असते म्हणजे पध्दती कोणतीही असो व्यक्ती मुख्य स्थानी व तिच्याविषयी सांगणारे 'मीत्व' गौणस्थानी असते. तसे झाले नाही तर व्यक्तिचित्रे यशस्वी होणार नाहीत थोडक्यात डॉ. आनंद यादव म्हणतात त्याप्रमाणे, व्यक्तिचित्र ध्येय असू शकते.[१३] रघुवीर सामंत, पु. ल. देशपांडे, व्यंकटेश माडगुळकर, विद्याधर पुंडलिक, यांनी 'मी' ला दिसलेली व 'मी' ने अनुभवलेली जी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत, ती महत्त्वाची ठरतात.

### ५. ललितलेख

'ललितलेख' या ललितगद्याच्या उपप्रकाराविषयी शांता शेळके म्हणतात, असाच हौसेने सतत लिहित राहिलेला आणखी एक प्रकार म्हणजे ललितलेख. हा प्रकार मला मनापासून आवडतो. माटे म्हणत असत, 'काही अनुभव बचकेने घ्यायचे असतात, तर काही चिमटीने उचलायचे असतात.' ललित लेखनातला अनुभव हा असाच चिमटीने उचलायचा अनुभव आहे. दैनंदिन जीवनात असे सूक्ष्म अनुरूप अनुभव येत असतात. क्वचित काही वाचनात येते. ते अर्थपूर्ण असते. मला ते आतून अस्वस्थ करुन सोडते. पण त्याला कथारूप देता येत नाही. त्याचा आवाका फार मोठा नसतो. असे अनुभव ललित लेखनातूनच मांडण्याजोगे असतात. मला जेव्हा असे काही सूक्ष्म, अस्पष्ट, धुसर जाणवले, भावले तेव्हा मी ते ललित लेखनातून व्यक्त करीत गेले.[१४] शांताबाईंच्या या अभिप्रायावरुन ललितलेखाचे स्वरूप काय असते, याची कल्पना येते. या लेखातून चटपटीतपणा असतो. कोणताही विषय रंजक शैलीत वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न येथे केला जातो. आकर्षक - चमकदार वाक्याने सुरुवात करुन प्राणी, पक्षी, निसर्ग इत्यादी चेतन अर्धचेतन किंवा अचेतन विषयवस्तू मांडली जाते. ही विषयवस्तू लेखक 'मी' नेच अनुभवलेली असते व त्याच्या पाऊलखुणा जागोजागी उमटलेल्या दिसून येतात. फरक इतकाच की, 'मीत्वा' ची जाणीव १९५० नंतरच्या काळात अधिक प्रगल्भ झालेली दिसते. थोडक्यात मनोरंजक गोष्टी, किस्से लालित्यपूर्वक भाषेत सांगणे हेच या लेखनाचे स्वरूप होते, असे म्हणता येईल. स्वातंत्र्यपूर्व काळात चिपळूणकर, सरदेसाई यांनी

पै, अरुणा ढेरे, फादर दिब्रिटो, मारुती चितमपल्ली यांचा आर्वजून उल्लेख करावा लागतो. त्यांनी चोखंदळ वाचकांना आकृष्ट करणारे लेखन केले आहे. नवरे यांचे 'कवडसे' (१९७५), शन्नाडे (१९९०), झोपाळा (१९९८), उनसावल्या (२०००), झोका (२०००) त्याच प्रमाणे पै यांचे 'आतला आवाज' (१९६१), 'सय' (१९९७), 'कोलाज' (१९९८) इ. अरुणा ढेरे यांचे 'लावण्ययात्रा' (१९८७), 'मनातलं आभाळ' (१९९४), 'आठवणीतले आंगण' (१९९९), 'मनातलं आभाळ' (१९९४) आणि फादर दिब्रिटो यांचे, 'तेजाची पाहुले' (१९९५), 'ओॲसिसच्या शोधात' (१९९६), 'सृजनाचा मोहर' (२००२) ही पुस्तके म्हणजे सदर लेखनाच्या निमित्ताने केलेले ललित लेखनच आहे.

थोडक्यात ललितगद्याच्या उपरोक्त वाटचालीवर प्रकाशझोत टाकल्यास वि. शं. चौगुले म्हणतात ते बरोबर वाटते ते म्हणतात, अस्सल सृजनशील प्रतिभेच्या उत्कट आविष्कारापासून ते अगदी तात्कालिक जुजबी स्वरुपाच्या लेखनापर्यंत कशाचाही त्यात अंतर्भाव होतो. १५ म्हणजे आत्मकथन, प्रवासलेखन, विनोदी लेखन, शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे, वृत्तपत्रीय लेखन असे सगळे प्रकार ललितगद्याच्या पोटात सुखाने बसू शकतात असे म्हणता येते. म्हणजे या वाङ्मय प्रकाराबाबतची दृष्टी आता तेवढी काटेकोर राहिलेली नाही. त्यात भिन्न वाङ्मय प्रकाराची सरमिसळ होणे गैर नाही. अर्थात स्वागतार्हच आहे. एखाद्या वाङ्मयप्रकाराच्या मूळ संरचनेचा धक्का न लावता तसे झाले तर वाङ्मयप्रकारांना बळच प्राप्त होईल.

**समारोप**

'ललितगद्य' या वाङ्मयप्रकाराचे तात्त्विक स्वरूप व त्याची वाटचाल आपण पाहिली. वैचारीक निबंध, लघुनिबंध, नवलघुनिबंध, ललितनिबंध, ललितलेख, ललितगद्य असा प्रवास केलेले ललितगद्य आता 'मुक्तगद्याच्या रुपात' वावरते आहे. भविष्यात आणखी कोणते त्यांचे रूप अवतरेल याची कल्पना आज करता येत नाही. मुळात हा प्रकारच मुळी 'Formless Form' असल्यामुळे तो स्वैर प्रकृतीचा बनलेला आहे. अर्थात ललितगद्यात आविष्कृत होणारा अनुभव हा लेखक 'मी' चा असून त्याच्यात द्विकेंद्रियता असते. ललितगद्याची ही मूळ प्रकृती लक्षात घेऊन त्याच्याकडे पाहिले पाहिजे. तसे झाले तरच गद्य साहित्याचा एक महत्वाचा प्रकार म्हणून त्यास मान्यता मिळेल.

••



# ६.

# 'परिपूर्ति'
# चिंतनगर्भ लेखांचा लालित्यपूर्ण आविष्कार

**डॉ. सतीश कामत**

**प्रास्ताविक**

इरावती कर्वे या सुप्रसिद्ध मानववंशशास्त्रज्ञ आणि लेखिका आहेत. महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या सूनबाई आणि पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. दिनकर धोंडो कर्वे यांच्या त्या पत्नी होत. इरावतीबाईंचा जन्म दि. १५ डिसेंबर १९०५ रोजी, ब्रह्मदेशातील (आजचा म्यानमार) मिंज्यान येथे एका मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबात झाला. त्यांचे वडील तेथे अभियंते होते. इरावती कर्वे यांचे बरेचसे शिक्षण पुण्यात रँ. र. पु. परांजपे व कुटुंबीय यांच्या सान्निध्यात झाले. बी. ए. नंतर डॉ. घुर्ये ह्या प्रख्यात समाजशास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाने 'चित्तपावन कोकणस्थ ब्राह्मण' या विषयावर प्रबंध लिहून इरावतीबाईंनी एम.ए.ची पदवी प्राप्त केली. त्यांचे पुढील उच्च शिक्षण जर्मनीत झाले. 'मनुष्याच्या डोक्याच्या कवटीची नेहमीची असमप्रमाणता' या मानववंशशास्त्राशी संबंधित अशा विषयावर प्रबंध लिहून त्यांनी जर्मन विद्यापीठातून पीएच.डी.ची पदवी संपादित केली. पुढे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या त्या कुलसचिव बनल्या. नंतर १९३९ मध्ये पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये त्यांची समाजशास्त्र व मानववंशशास्त्र या विषयांच्या प्रपाठक म्हणून नेमणूक करण्यात आली. तिथेच शेवटी विभागप्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले. इरावतीबाईंनी मानववंशशास्त्र व समाजशास्त्र विषयांत विपुल असे संशोधन करून तब्बल ८० संशोधनपर निबंध लिहून प्रकाशित केले. त्यांनी 'महाराष्ट्र लँड अँड पिपल', 'मराठी लोकांची संस्कृती' असे दर्जेदार ग्रंथ लिहिले आहेत. अनेक नियतकालिकांतून त्यांनी स्फुट स्वरूपाचे लेखनही केले आहे. मानववंशशास्त्र विषयक व्यासंगामुळे इरावतीबाईंनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये व्याख्याने दिली आहेत.

व स्वातंत्र्योत्तर काळात माधव आचवल, शांता शेळके व अलिकडे रवींद्र पिंगे आदी लेखकांनी या प्रकारात विपूल लेखन केलेले दिसते.

थोडक्यात उपरोक्त उपप्रकार वस्तुनिष्ठेकडून आत्मनिष्ठेकडे वळलेले दिसतात. 'ललितगद्य' या वाङ्मय प्रकारांतर्गत त्यांचा विचार केला जातो. एका अर्थी 'ललितगद्य' हे अनेक उपप्रकारांचे कुटुंब मानावे लागते. या मोठ्या कुटुंबातील हे छोटे छोटे उपप्रकार तोंडावळ्यावरुन एकसारखे वाटत असले, तरी ते एकमेकापासून पूर्णतः भिन्न आहेत हे यावरुन लक्षात येईल.

**'ललितगद्य' या वाङ्मयप्रकाराची वाटचाल**

लघुनिबंधाच्या १९४५-५० पर्यंतच्या वाटचालीनंतर ललितगद्याचा विकास झाला. त्याचे श्रेय प्रामुख्याने माधव आचवल, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, श्रीनिवास कुलकर्णी, ग्रेस, मधुकर केचे या लेखक मंडळींचे आहे. याशिवाय वि. वा. शिरवाडकर, के. ज. पुरोहित, ना. ग. गोरे, वि. द. घाटे यांनीही वेळोवेळी ललितगद्य लेखन केलेले आहे. कुसुमावती देशपांडे, इरावती कर्वे यांच्या गद्यलेखनाने पुढील काळातील गद्यलेखनाच्या वाटा मोकळ्या केल्या. कुसुमावती देशपांडे यांचे 'दिपकळी' (१९३५), 'दिपदान' (१९४१), 'मोळी' (१९४६), 'दिपमाळ' (१९५८) हे संग्रह यासंदर्भात लक्षणीय आहेत. या लेखनातील कथात्मकता, काव्यात्मता लोभस असून त्याचे स्वरूप पूर्वीच्या तंत्रबध्द लघुनिबंधापेक्षा वेगळे आहे. ललितगद्याला अंतर्गत भाववृत्तीचे लेणे कुसुमावती देशपांडे यांनी दिले. त्याचाच विकास पुढे इरावती कर्वे आणि दुर्गाबाई भागवतांच्या लेखनातून दिसतो. कर्वे यांचे 'परिपूर्ति' (१९४९), 'भोवरा' (१९६४), 'गंगाजल' (१९७२), दुर्गाबाई यांचे 'ऋतुचक्र' (१९५६), 'भावमुद्रा' (१९६०), 'व्यासपर्व'. (१९६२), 'रुपरंग' (१९६७), 'पैस' (१९७०), 'इब' (१९७०), 'दुपानी' (१९९५) हे संग्रह या संदर्भात विचारणीय आहेत. त्यांच्या लेखनातील सामाजिक जाणीव पाहता विचारशीलतेबरोबर संवेदनशील मनाचा प्रत्यय येतो.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या लेखनाने ललितगद्याच्या मुख्यतेचा पुढचा टप्पा गाठला. 'डोह' (१९६५), 'सोन्याचा पिंपळ' (१९७५), 'पाण्याचे पंख' (१९८७), 'कोरडी भिक्षा' (२०००) या संग्रहातील लेखनातून संवेदनशीलता, काव्यात्मकता, प्रतिमामुक्तता, अनुभवाला समूर्त करणारे संघटनसूत्र आणि विविध भावावस्था प्राप्त झालेले अनुभव हे लेखनाचे विशेष प्रत्ययाला येतात. १९६० च्या दरम्यान एक विशेष गोष्ट घडली ती म्हणजे बहुजन समाजातील लेखक लिहिते झाले. ग्रामीण प्रादेशिक, दलित, वंचित आणि आदिवासी जाणिवांचा एक सशक्त



प्रवाह साहित्याच्[illegible]ंतात येऊन मिळाला. त्यांचे जगणे भोगणे साहित्याचा विषय झाला. सामाजिक अंगाने ललित गद्याचा विकास याच काळात झाला. आनंद यादव, केशव मेश्राम, प्र. ई. सोनकांबळे, चंद्रकुमार नलगे इत्यादींनी समाजचिंतनपर लेखन केले. व्यंकटेश माडगुळकरांनी ग्रामीण जीवन आणि निसर्ग आपल्या लेखनातून आविष्कृत केला. पुढे १९७४ ते २००२ या काळातील महत्त्वपूर्ण लेखक म्हणून अनिल अवचट, विजया राजाध्यक्ष, इंदिरा संत, शिरीष पै, रत्नाकरी मतकरी, विजय तेंडूलकर, मारुती चितमपल्ली यांचा उल्लेख करता येईल. विविध क्षेत्रातील अशा कितीतरी लेखकांनी आपल्या अनुभवाची विविध रूपे ललितगद्यातून साकार केली आहेत. रविंद्र पिंगे यांची याच काळात जवळ जवळ २६ पुस्तके प्रसिद्ध झाली. यशवंत पाठकांच्या 'ब्रह्मगिरीची सावली' (१९८६), 'नक्षत्रांची नाती' (१९८७), 'मातीचं देणं' (१९९०), 'मोहर मैत्रीचा' (१९९८), 'आभाळाचं अनुष्ठान' (२०००) या संग्रहातून वारकरी संप्रदायाशी संबंधीत निराळेच विश्व समोर आले आहे. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या 'वारा वाहे झुणझुणा' (१९७२), 'दिपमाळ' (१९७४) या संग्रहातून कवी आरतीप्रभूंचे दर्शन होते. खानोलकरांच्या बरोबरच प्र. श्री. नेरुरकर, मधु मंगेश कर्णिक, जयवंत दळवी, आ. ना. पेडणेकर आदींनी कोकणाचे नयनरम्य दर्शन घडविले आहे.

सदर लेखनातून जन्माला आलेले ललितगद्यही महत्त्वाचे आहे. वृत्तपत्र-नियतकालिकांतील सदरांनी वाचकांचे रंजन आणि प्रबोधन केले. आत्मनिष्ठ स्वरुपाच्या या लेखनाला सर्वच स्तरातून चांगला प्रतिसाद मिळाला आणि ललितगद्याच्या कक्षा रुंदावण्यास मदत झाली. विजय तेंडूलकर यांचे 'रातराणी' (१९७१), 'फुगे साबणाचे' (१९७४), 'कोवळी उन्हे' (१९८५), 'हे सर्व कोठून येते' (१९९२), 'रामप्रहर' (१९७४) तसेच माधव गडकरी यांचे 'असा हा महाराष्ट्र' (भाग १ व २), 'असा हा गोमंतक' (१९७५), 'चौफेर' (२०००) हे संग्रह वृत्तपत्रीय सदरलेखनातून जन्माला आले आहेत. 'जनमत' (१९९५), 'कालमीमांसा' (२००१), 'सारांश' (२००१), 'लेले आणि मी' (१९९८), 'ओच्या कोच्या' (२००२), 'स्थलकाल' (२००४), 'समाजस्पंदने' (१९९०) या अरुण टिकेकरांच्या ललितलेखनातून अभ्यासू संशोधक डोकावताना आढळतो. याशिवाय सदा डुंबरे (आरसपानी), विजय कुवळेकर (पैलू), वसुंधरा पेंडसे नाईक (कुटुंबकथा), ह. मो. मराठे (दिनमान), अरुण साधू (अक्षांश-रेखांश), महेश केळुसकर (साष्टांग नमस्कार) यांनी केलेल्या सदर लेखनातून पुस्तकांची निर्मिती झाली आहे.

ललितगद्यांच्या वाटचालीतील महत्त्वाचे लेखक म्हणून शं. ना. नवरे, शिरिष

इरावतीबाई कर्वे यांनी मराठीत मोजक्या पण अत्यंत मार्मिक असे ललितलेखन केले आहे. 'परिपूर्ति', 'गंगाजल' व 'भोवरा' ही त्यांची ललितलेखनाची पुस्तके महत्त्वपूर्ण आहेत. साहित्य अकादमी व राज्य शासनाचे पुरस्कार प्राप्त झालेल्या 'युगान्त' या ग्रंथाने मराठी साहित्याला अधिकच कसदार बनवले आहे. महाभारतावरील त्यांच्या दीर्घ व्यासंगाचे मधुर फल म्हणजे 'युगान्त' हा ग्रंथ होय. 'परिपूर्ति', 'भोवरा' व 'गंगाजल' या तिन्ही पुस्तकांतील लेखांना इरावतीबाईंच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या अभ्यासपूर्ण श्रमंतीचा स्पर्श लाभला आहे. महाराष्ट्राची पुरातन संस्कृती हा सदैव त्यांच्या आस्थेचा विषय राहिला आहे. 'संस्कृती' म्हणजे काय? याची त्यांनी मूलभूत चिकित्सा केली आहे. इरावतीबाईंच्या व्यक्तिमत्त्वात एक आदर्श गृहिणी, महान समाजसंस्कृती अभ्यासक आणि सृजनशील लेखिका असा तिहेरी गोफ विणलेला दिसतो. म्हणूनच थोर संशोधक असूनही तीव्र संवेदनशीलता त्यांच्याजवळ होती असे म्हणता येईल.

इरावती कर्वे यांचे व्यक्तिमत्त्वही त्यांच्या प्रत्येक ललित लेखात भेटत राहते. इरावतीबाईंचे ऋजू, सश्रद्ध, ज्ञानपिपासु, निष्पक्ष, प्रांजळ, कणखर व भावमय व्यक्तित्वाचे अनेक रंग त्यांच्या लेखनात सामावलेले आहेत. इरावती कर्वे यांचे अनेक बौद्धिक, वाङ्मयीन छंदही त्यांच्या ललित निबंधात डोकावतात. उदा. शब्दांच्या व्युत्पत्ती शोधणं, नातेवाचक शब्दांची जमवाजमव करणं, प्राचीन साहित्य व संस्कृतीत येणाऱ्या संकेतांची, प्रतीकांची, गूढांची अत्यंत आत्मीयतेने उकल करणे इत्यादी. अशा या महान विदुषी आणि उत्कृष्ट लेखिकेचे ११ ऑगस्ट १९७० रोजी पुणे येथे निधन झाले. इरावती कर्वे यांनी मानवाच्या शारीरिक वर्गीकरणाचा व आप्तरक्तवंशसंबंधाचाही अभ्यास केला आहे. विविध संस्कृतींचा मिलाफ झालेल्या भारतातील कुटुंबरचनेचा सविस्तर व सखोल अभ्यास करून त्यांनी 'किनशीप ऑरगनायझेशन इन इंडिया' (१९५३) हा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यावर आधारीत हिंदूंच्या समाजरचनेचे विवरण करणारी व्याख्याने त्यांनी दिली आहेत. त्यांची 'परांजपे व्याख्यानमाला' (१९६३) व 'हिंदूंची समाजरचना' (१९६४) ही मराठी पुस्तके प्रकाशित आहेत.

**'परिपूर्ति' या ललित लेखसंग्रहाचे स्वरूप**

इरावती कर्वे यांचे 'परिपूर्ति' हे ललित निबंधाचे पुस्तक १९४९ साली प्रकाशित झाले. 'परिपूर्ति' मध्ये एकूण १८ ललित निबंध समाविष्ट केलेले आहेत. विषयानुरूप व प्रसंगोपात्त भावभावना आणि चिंतनशीलता यांचा मुक्त गोफ इथे दिसतो. त्यामुळेच व्यक्तिचित्रणे, अनुभवकथन, कथात्म चित्रण आणि



तीव्र विचारात्म लेखन इथे एकत्रितपणे पाहता येते. त्यांच्या प्रत्येक लेखात त्यांचे व्यासंगविषय म्हणजेच समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, प्राचीन संस्कृती, आधुनिक जीवनपद्धती इत्यादी या ना त्या रूपात प्रकट झालेले दिसतात. या संग्रहात प्रेमाची रीत, वेड लागलेले घर, जन्मांतरीची भेट, स्त्री व संस्कृती, बीज - क्षेत्र, मारीकुट्टी, गौराई, एकेश्वरी पंथाचा विजय, जुळी मुले, स्त्री राज्य, मराठ्यांचा मठ्ठपणा, महार आणि महाराष्ट्र, दिक्काल, नवं कलेवर, एक प्रयोग, सुप्त इच्छा, बाटचाल, परिपूर्ति हे लेख समाविष्ट आहेत. लेखिका इरावती कर्वे स्वतः घेतलेल्या अनुभवाविषयी चिंतन करतात. त्यामुळे सर्वच लेखांमधून लेखीकेची चिंतनशीलता आढळते. यातील बऱ्याच लेखांमध्ये स्त्रियांविषयी लेखन केलेले आहे. स्त्रियांचे अस्तित्व, तिची सुखदुःखे, तिच्या भावभावनात याविषयी लिहिते पण त्यात कुठेही अभिनिवेश नाही. लेखिकेचे व्यासंगी व्यक्तिमत्व आपल्याला सर्व क्षेत्रात दिसते. परंतु आपल्या ज्ञानाविषयी व्यासंगीपणाविषयी लेखिकेच्या मनात जराही अहंकार दिसून येत नाही. 'परिपूर्ति' या संग्रहातील बहुतेक लेखांना नाटकीपणा नव्हे तर नाट्यात्मकता लाभलेली आहे. इरावतीबाई आपला अनुभव सच्चेपणाने व्यक्त करतात. त्यामुळे एक राकट, दणकट, खंबीर आकार त्यांच्या लघुनिबंधाला प्राप्त झालेला आहे. 'परिपूर्ति' या संग्रहातील लेखांचा थोडक्यात परिचय करून घेता येईल.

**१. 'प्रेमाची रीत' निखळ लालित्याचा उत्कट आविष्कार**

या लेखात विलक्षण उत्कट, तरल व कथात्म असे जीवनानुभव आहेत. स्थल, काल, व्यक्तिपरत्वे प्रेमाची रीत कशी वेगवेगळी असते याबाबत लेखिका या लेखात आपले अनुभव सांगते. लेखिकेच्या पतीने जर्मनीत असताना बरीच माणसे जोडली होती. त्यापैकी एका वृद्ध स्त्रीला तो 'आजी' म्हणत असे. बर्लिनच्या विश्वविद्यालयात उच्च शिक्षणासाठी लेखिकेला जायचे होते त्यावेळी त्या आजीने तिची राहण्याची व्यवस्था, शिक्षणाची व्यवस्था उत्तमरित्या केली. या आजीची मुका घेऊन प्रेम व्यक्त करण्याची रीत लेखिकेला आवडत नव्हती. त्यामुळे ती मुका घेतल्याबरोबर लगेच अगदी नकळतच गाल पुसून टाकत असे. त्या आजीबाईला हे अपमानकारक वाटले. लेखिकेने तिची समजूत घातल्यावर तिचे समाधान झाले. लेखिकेच्या सासूने तर नाहीच पण लेखिकेच्या आईनेसुद्धा एवढ्या मोठ्या मुलीचा मुका कधी घेतला नाही, असा लेखिकेने खुलासा केल्यावर ती आजी चकीत होते. पुढे पाश्चात्य देशातील आणखी एक अनुभव लेखिका सांगते. पाश्चात्य देशातील लग्न होऊन नव्याने आपल्या सासरी आलेली

एक सून रात्री निजायला जाताना सासू सासऱ्यां[illegible] चुंबनाने निरोप घेताना लेखिकेला दिसते. साहजिकच लेखिकेला ती स्वतः प्रथम आपल्या सासरी आली तो प्रसंग आठवतो. त्या प्रसंगी तिने प्रत्येक वडीलधाऱ्याला वाकून नमस्कार केला होता, हेही तिला आठवते. त्यातील अर्थपूर्णता लेखिकेने पुढील शब्दांत मिस्कीलपणे व्यक्त केली आहे. मनातल्या मनात मी म्हटले, इतक्या थोरल्या अनोळखी माणसांचे मुके घेण्यापेक्षा नमस्कार करणे बरे बाई. लेखिकेच्या पतीच्या परिचित व्यक्तीकडे लाइपझिग्ला लेखिका अधूनमधून जात असे. त्या कुटुंबातील थोरल्या सुनेला छानसे बाळ झाले होते. ते गोंडस बाळ पाहताच लेखिकेने त्याला हृदयाशी धरले व पटापट त्याचे मुके घेतले. एरव्ही प्रेम व्यक्त करताना वयाची मर्यादा वा लिंगभेद याचा विचार न करता परस्परांचे मुके घेणारी त्या कुटुंबातील पाश्चात्य मंडळी मात्र हे पाहून धक्का बसल्यासारखी स्तब्ध होती. लेखिकेला याचे आश्चर्य वाटले तेव्हा त्या सुनेने लहान मुले फार नाजुक असतात व पडसे, क्षय इ. संसर्गजन्य रोग होऊ नयेत याकरता त्याचे मुके घेणे योग्य मानले जात नाही असा खुलासा केला. लेखिकेला तिचे म्हणणे पटले.

दोन वर्षे परदेशात राहिल्यावर मात्र लेखिकेला या मुक्यांची सवय झाली. बायांनी मुका घेतल्यावर गाल न पुसता, पुरुषांनी हाताचा मुका घेतल्यावर हात न पुसता ती तशीच बसून राहत असे. लेखिका व तिचे पती एकदा परदेशात आगगाडीने प्रवास करत असताना त्या गाडीने खूप तरुण शिपाई लांबच्या वसाहतीला जात होते. त्यांना निरोप देण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती. गाडी निघताच प्रत्येक शिपायावर त्याच्या सर्व नातेवाईकांनी सशब्द मुक्यांचा भडीमार केला व त्या आवाजाने लेखिका, तिचा पती दचकलेच. पुढे जर्मनीतील ही 'प्रेमाची रीत' अनुभवलेली लेखिका भारतात परतल्यावर आईवडिलांना वाकून नमस्कार करते. आईला नमस्कार करताना हळूच वाकून तिचे चुंबन घेते, तेव्हा तिची आई चकीत होते. यातही लेखिकेच्या स्वभावातील मिस्कीलपणा प्रकट होतो. त्यानंतर काही वर्षे लोटली. लेखिका व तिची सर्व भावंडे घरी जमली होती. तेव्हा प्रत्येक भाऊ आपल्या पत्नीला घेऊन कुठे ना कुठे फिरायला गेला. हे पाहून लेखिकेच्या आईचा कंठ दाटून आला. तेव्हा लेखिकेच्या वडिलांनी तिला स्वतःची प्रेमाची रीत समजावून सांगितली. ते म्हणाले, चार लोकांची रीत तीच आपली ठेवावी लागते. केवळ पत्नीच्या जवळ बसून, तिच्या सोबत फिरायला जाऊनच पत्नीवरील प्रेम व्यक्त होते असे नाही, हे त्यांनी तिला पटवून दिले. एकदा रस्त्यालगत खेळता खेळता एक लहान मुलगा टांग्यासमोर आला. तेव्हा मुलाच्या आईने



त्याला ओढले. दोन[illegible]ार रट्टे दिले व म्हटले, पटकी झाली मेल्याला, कशाला तडफडायला रस्त्यावर गेला होतास रे? आई भवानीची खैर म्हणून वाचलास रे या त्राग्यातून त्या आईचे आपल्या मुलावरचे प्रेमच दिसून येते. प्रत्येकाची प्रेमाची रीत वेगळी असते. प्रेम ही एक तरल संवेदना आहे. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या म्हणीनुसार माणसांमाणसांत स्वभाव, सवयी यांच्या भिन्नतेप्रमाणे प्रेम करण्याची रीतसुद्धा वेगवेगळी असू शकते, असे लेखिका या लेखात स्पष्ट करते.

**१. 'वेड लागलेले घर' स्त्रीच्या वात्सल्याचा अत्यंत तरल आणि सूचक आविष्कार**

कौटुंबिक जीवनात घडणाऱ्या नित्याच्या गोष्टींचा वेध लेखिकेने या लघुनिबंधात घेतला आहे. घरातील लहान मुले सारखी धडपडत असतात. लेखिका सतत त्यांची काळजी वाहत असते. त्यांना औषधपाणी देत असते. मुलांना वारंवार ताकीद देऊनही मुले सतत धडपडतातच. लेखिकेला त्यांच्यामागे धावपळ करावी लागते. मुलांचे वडील मात्र निश्चित असतात. या ललितलेखात लेखिकेने फॅन्टसीचा आधार घेतलेला आहे. लेखिकेचे घर, घरातील वस्तू मुलांची काळजी घेऊ लागतात. मुलांना लागू नये म्हणून दरवेळी ती सावध राहतात. याचा दुष्परिणाम त्या आईच्या लक्षात येतो. मुले घरात बिनधास्त होतात व तशीच ती बाहेरही वागू लागतात आणि संकटात सापडतात. एके दिवशी लेखिका धाकटीचा परकर शिवत बसलेली असते तेवढ्यात गौरी धावत धापा टाकत येते. नेहमीप्रमाणे ती न पाहता येत असते. येताना टेबलाच्या अणुकुचीदार कोपऱ्यावर आता डोळा आपटणार असे लेखिकेला वाटते. अगं, अगं म्हणत ती उठते तो चमत्कार घडतो. टेबल थोडेसे मागे सरकते व गौरीचा डोळा बचावतो. टेबल कसे सरकले? की आपल्याला भास झाला? असा लेखिकेला प्रश्न पडतो. तसेच लेखिकेचा मुलगा नंदूदेखील दारावर आपटण्यापूर्वी दार आपोआप उघडते व तो सुखरूपपणे बाहेर पडतो. लेखिका घरावर बारकाईने लक्ष ठेवते आणि तिच्या लक्षात येते की, मुलाचे डोके आपटणार एवढ्यात भिंती आत वाकतात, मुले बागेत दगडाला ठेचाळू नयेत म्हणून ते दगड बाजूला होतात. मुलांना काहीही लागत नाही. त्यामुळे मुले जास्तच बेफिकीर राहू लागतात. घराच्या या अतिसावध वृत्तीबद्दल ती आपल्या पतीकडे तक्रार करते. पण तोही त्याकडे फारसे लक्ष देत नाही. शेवटी घरास वेड लागल्याची खात्री होऊन ते कधी व का लागले असावे याचा विचार करू लागताच मागे एका प्रसंगी तिच्या दिराने 'बालमानसशास्त्रा' संबंधी दिलेले व्याख्यान तिला आठवते. ह्या व्याख्यानाचा लेखिकेच्या मनावर नसला,

तरी घराच्या मनावर मात्र परिणाम होऊन ते बालमानसशास्त्राच्या दृष्टिकोनानुसार वागू लागतें व त्याला कसे समजवावे हे लक्षात न येऊन लेखिका हताश होते. एके दिवशी लेखिका आपल्या मुलीसह बागेत उभी असते. तेवढ्यात समोर रस्त्यापलिकडे राहणारा मुलगा तिला हाक मारतो. लेखिकेची मुलगी गौरी कसलाही विचार न करता धाव घेते. त्यावेळी रस्त्यातून मोठी लष्करी मोटार भरधाव येत असते. ब्रेक दाबून गाडी थांबते, म्हणून अपघात टळतो. या प्रसंगामुळे गौरी खूप भेदरते. या प्रसंगी लेखिकेला रडू येत असते. परंतु त्याहीपेक्षा तिला खूप राग येतो. लेखिका घरातील सर्व वस्तूंना दम भरते. लेखिकेने असा सज्जड दम भरल्यावर वेडे झालेले घर पूर्वपदावर येते. पण तेवढ्यातच लेखिकेने नंदूचे किंचाळणे ऐकले. नंदूचे डोके आपटून चांगलेच सुजले होते. लेखिकेने दिलेल्या तंबीचा घरावर तात्काळ परिणाम होऊन ते शहाण्यासारखे म्हणजे चार घरांसारखे वागू लागते. या ललितलेखातून लेखिकेला सुचवायचे आहे की, घरात फार जोपासलेली, सुरक्षित ठेवली गेलेली मुले बहुधा बाहेरच्या जगात जगायला लायक ठरत नाहीत. दुःखाचासुद्धा अनुभव हवा. या अनुभवानेच जगात कसे वागावे हे त्यांना समजते. मुलांवर जीवापाड प्रेम करणारी, मुलांना भल्याबुऱ्या गोष्टींचे ज्ञान देऊन सक्षम बनवणारी लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वातील आईची भूमिका यात दिसते.

**३. 'जन्मान्तरीची भेट' उत्खननाद्वारे सापडणाऱ्या मानवी अवशेषांचा अभ्यास**

उत्तर गुजरातमधील वाळवंटी प्रदेशात जमिनीत खोलवर दडलेल्या हजारो वर्षांपूर्वीच्या मानवी संस्कृतीचा शोध घेण्याचे काम हाती घेतले गेले. त्यावेळी त्या कामाचे प्रमुख प्रा. सांकळीया, एक छायाचित्रकार, एक भूपर्यवेक्षक (सर्वेयर), प्रा. सांकळीया यांचे एक मदतनीस, लेखिका, तिचा एक विद्यार्थी व मदतनीस असे सर्वजण या कामात सहभागी असतात. कामाला योजनाबद्ध रीतीने सुरूवात केल्यावर दिवस संपता संपता थोडीथोडी दगडाची हत्यारे सापडू लागतात. या प्रकल्पाचे प्रमुख हे प्रागैतिहासिक काळातील दगडाच्या हत्यारांचे एक निष्णात संशोधक असल्यामुळे ते त्यांची पाहणी करतात. लेखिकेने मनुष्याच्या कवट्या व हाडे यांचा मुख्यत्वे अभ्यास केलेला होता. म्हणून माणसाचे हाड दिसले की तिच्या ताब्यात दिले जाई. चित्रकार, भूपर्यवेक्षक खड्यांचे अवशेषांचे फोटो व चित्रे काढीत आणि नकाशे तयार करीत. एकदा मातीच्या ढेकळात रूतलेली एक कवटी सापडली. सुरी-दाभण-कुंचले यांच्या सहाय्याने लेखिकेने ती साफ केली. त्यावरून लेखिकेने ती एका वृद्ध माणसाची असल्याचे सांगितले. त्या पाठोपाठ



एका तरुणाचा पूर्ण सांगाडा सापडला. त्याच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूला कपाळापासून तो हनुवटीपर्यंत साफ घाव बसून मोठी फट पडली होती. दुसऱ्या दिवशी त्या सांगाड्यापलीकडे पाच - सहा हातांवर एक कुत्रे पुरलेले आढळते. त्याच्या डोक्यात दगड घालून ठार मारण्यात आले होते. त्यावर, 'ह्या जुन्या वसाहतीत एक माणूस बहुधा पुरुष मेला असला पाहिजे व त्याला पुरताना त्याचे नोकरचाकर, हत्यारे त्याचा विश्वासू कुत्रा सगळ्यांना मारून पुरले असले पाहिजे असा उलगडा लेखिकेने केला, तो सगळ्यांना पटला व काम दुप्पट उत्साहाने सुरू झाले. या गतकालांतील जीवनाच्या अद्भूत आविष्काराने लेखिकेचे मन भारावल्यासारखे झाले होते.

अनेक मानवी सांगाडे सापडल्यावर ते साफ करून, कापसात गुंडाळून ट्रंकेत ठेवणे वगैरे कामे लेखिका मदतनीसाच्या सहाय्याने करीत होती. पण तिचे मन अस्वस्थ होते. आपल्या मनःस्थितीचे वर्णन लेखिका पुढील शब्दात करते, 'हिवाळ्याच्या दिवसात दाट धुक्यांतून पलीकडे काहीतरी ओळखीचे दिसल्याचा भास होऊन ती वस्तू परत धुक्यांत गुरफटून जावी तसे मला झाले होते. काहीतरी अगदी जवळ आहे, पण हाती लागत नाही असे सारखे वाटत होते. 'अशा मनःस्थितीत असताना दुसऱ्याच दिवशी एका बाईचा सांगाडा सापडला. लेखिकेतील मानववंशशास्त्रज्ञाला त्या सांगाड्याच्या जागी एक तरुण कोवळी स्त्री दिसू लागते आणि बघता बघता तिच्या जागी लेखिकेला हजारो वर्षांपूर्वीचे स्वतःचे अस्तित्व जाणवू लागते. 'एका देहाची आपल्याच पुरातन देहाच्या सांगाड्याशी' जणू भेट होते आणि लेखिकेच्या मनातील अनामिक अस्वस्थतेचा, वादळाचा, हुरहुरीचा अर्थ क्षणार्धात उमजतो. उत्कट संवेदनशीलता अखेर साक्षात्कारानुभवात कशी पर्यवसित होते याचे हा लेख एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

**४. 'स्त्री व संस्कृति' भारतीय स्त्रियांच्या मनोवस्थेचे वर्णन**

लेखिकेने समाजात पाहिलेली काही उदाहरणे या लेखात सांगितली आहेत. लेखिका काही दिवस वाईला राहायला होती तेव्हा तेथे एक तरूण जोडपे होते. नवरा उत्तम गवंडी होता. बायको एक-दोन घरी मोलमजुरी करी. नवरा महिन्यात एकदा तरी बायकोला मारत असे. लेखिकेला थोडेसे आश्चर्य वाटले. लेखिका व वाड्यातील गृहस्थांची या विषयावर चर्चा झाली. तालुक्यातील शेतकरी आपल्या बायकांना मारतात का? यांची माहिती घेण्यासाठी लेखिकेने त्यांना सांगितले. तेव्हा प्रत्येक जन कधीतरी आपल्या बायकोला मारतोच हे कळल्यावर त्या गृहस्थांना फार वाईट वाटले. खरोखर, हिंदुस्थानातले पुरुष सुसंस्कृत कधी होणार

कोण जाणे. शिक्षणाने या कार्याला किती [illegible] लागतील असे वाटते तुम्हाला? त्यांच्या या प्रश्नाचे उत्तर देण्याचे लेखिकेने टाळले. कारण सुसंस्कृत काय आणि असंस्कृत काय याबद्दल लेखिकेला नेमके उत्तर देता येत नव्हते. संस्कृतीची व्याख्या करणे लेखिकेला दिवसेंदिवस जास्तव अवघड वाटू लागले.

पुढे लेखिकेने बालगुन्हेगारांच्या न्यायालयातील एका केसबद्दल सांगितले आहे . पत्नीला मारणाऱ्या पतीकडून यापुढे न मारण्याचा करार लिहून घेतला गेला. त्यानंतर ती पत्नीच पतीला धाकात ठेवू लागली. नंतर तो करार संपल्यावर पत्नीचा बेगुमानपणा नाहीसा झाला. लेखिका आपल्या प्रवासातील एक प्रसंग या संदर्भात सांगते. या प्रवासात तिला एक तरुण स्त्री भेटते. ती लेखिकेला ओळखते. तिचे नाव ऐकल्यावर ती देखील एक कवयित्री आहे हे लेखिकेच्या लक्षात येते. कामकाजाच्या गोष्टीविषयी बोलणे झाल्यावर कौटुंबिक विचारपूस झाली, तेव्हा तिने आपण विवाहित असून नवऱ्याकडे राहत नसल्याचे सांगितले. तिचा पती उच्चविद्याविभूषित (एम.ए., पीएच. डी.) आहे. त्याच्यात तडफ म्हणून नाहीच. तो फारच गरीब स्वभावाचा आहे. वरवर संस्कृतीची आभरणे ल्यालेल्या, पण आतून रानटी पौरूषाची पूजा करणाऱ्या ह्या 'तडफदार' तरुणी आणि सुसंस्कृत, शिक्षणाने कोमल मनोवृत्ती झालेले अहिंसक तरुण ह्यांची जोडी एकत्र नांदणार कशी? प्रत्येक स्त्रीच्या मनोवृत्तीतला फरक या लेखात आपल्याला दिसतो. पत्नीला मारणारा पती असंस्कृत हे रूढ समीकरण अपुरे आहे हे लक्षात येते ते सुशिक्षित, सुसंस्कृत व सुकोमल मनाच्या पतीविषयीची त्याच्या तडफदार पत्नीची कैफियत ऐकूनच. जुन्या सिद्धांताचा पडताळा व नवसिद्धांताच्या प्रस्थापनेची अटळता हे या लेखाचे प्रधान सूत्र दिसून येते.

**५. 'बीज-क्षेत्र' न्यायाविषयी समाजाची पारंपरिक मानसिकता स्पष्ट करणारा लेख**

लेखिकेची मुलगी सासरी छळ होतो म्हणून माहेरी येते. सासरी सासुकडून ऐकून घ्यावे लागते. नातवावरून तिची सासू म्हणते, 'चूप-चूप किती तोंड करतेस? म्हणे आई! तू त्याला सांभाळणारी दाई आहेस दाई! म्हणे, 'पोसले माझ्या पोराला? कुठचा तुझा पोर? तुझ्या कुणग्यात आम्ही आमच्या कुळाचे बीज रक्षण करायला दिले. तुला खायला घातले त्या अन्नावर तो पोसला. पहिल्यांदा आत पोसलास, आता बाहेर पोसतेस दाई ती दाई, आणि वर मिजास पहा! हे सर्व कळल्यावर लेखिकेला दुष्यन्ताची आठवण येते.

*भस्मा माता पितुः पुत्रः येन जातः स एव सः ।*



*भरस्व पुत्रं [illegible]न्त नाममंस्थाः शकुन्तलाम् ।।*

आई केवळ चामड्याची पिशवी आहे. मुलगा बापाचाच. बापच त्याच्या रूपे जन्म घेतो. हे दुष्यन्तराजा, मुलाला सांभाळ. शकुन्तलेचा धिक्कार करू नकोस. लेखिकेला हे सर्व आठवल्यावर तिच्या मनात विचार येतो की, मैनाच्या सासूबाई आणि दुष्यन्तराजा ह्यांच्यात तीन-चार हजार वर्षांचे अंतर असेल पण हे दोन जीव एकाच संस्कृतीने कसे अगदी जवळ बांधले गेले होते! हाच तो बीजक्षेत्रन्याय पण त्याचा उपयोग मात्र दुधारी शस्त्रासारखा दुहेरी होई. दुष्यन्ताच्या परिस्थितीत जेव्हा एखाद्या स्त्रीशी लग्न झाल्याचा पुरावा देता येत नसेल किंबहुना लग्न झालेच नसेल तेव्हा ज्याचे बीज त्याचे संतान असा युक्तिवाद लढवून मुलावर हक्क सांगायचा आणि जेव्हा पुत्रोत्पत्तीची शक्ती नसेल तेव्हा क्षेत्रावर हक्क सांगून क्षेत्रात जे उगवेल ते शेताच्या धन्याचे म्हणून त्यावर हक्क सांगायचा व बऱ्यावाईट मार्गाने संतती मिळवायची असा पूर्वीचा राजमार्ग होता. लेखिका यावर म्हणते की, मातृत्व ही एक नैसर्गिक घटना आहे. पितृत्व हा सामाजिक संकेत आहे आणि समाजात नैसर्गिक घटनांपेक्षा सामाजिक संकेतांनाच जास्त प्राधान्य असते. विवाह हाही एक अतिप्रभावी सामाजिक संकेत आहे. लग्नाच्या स्त्रीवर तिच्या नवऱ्याची सर्वस्वी मालकी असते व तिची संतती नवऱ्याची होते हा संकेत मान्य केला जाई. महाभारतातील आख्यानात दुष्यन्ताच्या कथानकातील घटना मोठी मजेदार आहे. शकुंतलेशी संगत केल्याने जन्मलेल्या मुलाला आपले मानण्यास दुष्यन्ताने नकार दिला. कारण राजाने तिला त्याचवेळी राजधानीत आणले नव्हते त्याच्या घरी राहती मग तिच्या पोटी कोणाचेही पोर असते तरी त्यावर त्याची सत्ता होती. अखेर आकाशवाणी झाल्यावर 'मुलगा तुझ्या बीजाचा' अशी खात्री पटवून शकुंतलेचा स्वीकार केला गेला.

लेखिका यापुढे आदिपर्वातील एक भाग वाचते. निपुत्रिक विधवेला संतती निर्माण करण्यासाठी दिराशी संबंध ठेवता येत असे. म्हाताऱ्या शंतनूने आपल्या पराक्रमी मुलाच्या सुखाचा बळी देऊन एका शीलभ्रष्ट सुंदर मुलीशी लग्न केले, ती सत्यवती. तिला दोन मुलगे झाले. एक लग्नाच्या आधी मेला. दुसऱ्यासाठी भीष्माने काशीराजाच्या मुली आणल्या. त्यातील थोरल्या अंबाने स्वतःला जाळून घेतले व दुसऱ्या दोघींचे शंतनूच्या धाकट्या मुलाशी विचित्रवीर्याशी लग्न लागले. तोही वृद्ध निपुत्रिक म्हणून मेला कुलक्षय होणार म्हणून सत्यवतीने भीष्माला भावजयीशी लग्न करायला सांगितले. भीष्माने नकार दिला तेव्हा सत्यवतीने निर्लज्जपणे आपला कुंवारपणाचा वृत्तांत सांगितला व आपल्या मुलाला - व्यासाला

बोलावण्याचा बेत सांगितला. भीष्माने मान [illegible]ावली. त्या दुष्ट सासूने आपल्या थोरल्या सुनेला अंबिकेला, वंशवृद्धीसाठी 'भीष्माने युक्ती' सांगितली आहे असे मायावीपणे सांगितले त्यामुळे पुत्रोत्पत्तीसाठी आपल्या शूर दिराची निवड झाली असे वाटून ती सुंदर स्वप्ने पाहू लागली. प्रत्यक्ष मात्र त्या भयंकर जटाधारी ऋषीशी त्या राजकन्येला शय्यासोबत करावी लागली तिच्या आशेचे कोळसे झाले. ही बीजक्षेत्रन्यायाची, 'दीर' या शब्दाची विटंबना लेखिकेला अस्वस्थ करते. या लेखातून लेखिकेची संदर्भबहुलता, तिचा व्यासंग दिसून येतो.

**६. 'मारीकुट्टी' - जिवंत मनाची तरुणी**

मद्रासहून आगगाडीने कोचीनला निघालेल्या इरावतींना डब्यात 'मारीकुट्टी' नावाची दाक्षिणात्य कुरूप पण विलक्षण जिवंत मनाची तरुणी भेटते. या लेखाच्या प्रारंभी लेखिका तिच्याविषयी वर्णन करते की, किती कुरूप होती ती! तिचे कपाळ अरुंद होते, केस काळेभोर आणि भुंग्यासारखे कुरळलेले, नाक बसके नि फेंदारलेले व ओठ बरेच जाड. तिचे इंग्रजी बोलणे पण कानाला कसेसेच लागे. मारीकुट्टी स्वतःचा व सोबत असलेल्या सारम्माचा लेखिकेला परिचय करून देते. मारीकुट्टी या नावाचा अर्थ छोटी मेरी. मारीकुट्टीचे रूप, तिचे बोलणे तिच्या केसातील ऊ, तिच्या त्या कोंबड्या हे सर्व पाहून लेखिका कोपऱ्यात अंग चोरून वाचत बसते. काही वेळाने मारीकुट्टी लेखिकेला स्वतःविषयी सांगते. मारीकुट्टी एका वेड्यांच्या इस्पितळात मुख्य नर्स म्हणून काम करीत असे. नोकरीमुळे तिला घरापासून शेकडो मैल दूर रहावे लागे. तिला आईची सतत आठवण येई. वेड्यांच्या इस्पितळात ती वेड्यांमध्ये रमत असे. वेड्यांच्या कलाने घ्यावं, त्यांना आवडणाऱ्या गोष्टी आणून द्याव्यात, त्यांचं मन रमवावं, आठवड्यातून दोनदा मोटारीत घालून त्यांना फिरायला न्यावं इ. कामे मारीकुट्टी करीत असे. वडिलांच्या मृत्यूनंतर तिच्यावर घरची जबाबदारी पडली. गावच्या फादरच्या ओळखीने तिच्या आईने तिची नर्स म्हणून शिकण्याची व्यवस्था केली. तिच्यामागचे पाच भाऊ मिळवते झाल्यावर तिच्या आईने तिला नोकरी सोडण्यास सांगितले. परंतु स्वकष्टाचीच भाकर खाणे मारीकुट्टीने पसंत केले. लहानसहान गोष्टींतून ती स्वतः आनंद निर्माण करीत होती आणि स्वतःला नकळत जिथे जाईल तिथे आनंद पसरीत होती.

मारीकुट्टीविषयी प्रारंभी दुरावा निर्माण झालेले लेखिकेचे मन तिच्या विलक्षण उत्कटतेने जीवन जगण्याकडे वेधले जाते. मारीकुट्टी आपल्या सामान्य जीवनातील सामान्य सुखदुःखाला सामोरे जात आपल्या मनाची टवटवी, चैतन्य व आनंद



अबाधित राखते याब[illegible] लेखिकेला विशेष कुतूहल वाटते. मारीकुट्टी याच जीवनोत्साहाने आपल्या शहराचेही कौतुक करते. मात्र लेखिकेला तिच्या गावाविषयी विचारताच तिच्यासमोर पुण्यातील तिचे अवघे जीवन, पुण्याने दिलेले विविध अनुभव याची मालिकाच उभी राहते. माणूस एखाद्या गावाला आपले का म्हणतो असा प्रश्न पडणाऱ्या इरावतीबाईंना त्याची असंख्य उत्तरे संभवतात हे इथे लक्षात येते. सर्वसामान्य अनुभवातून उगम पावलेला हा लेख चिंतनशीलतेकडे वळताना दिसतो. इरावतीबाईंच्या संवेदनशील व विचारपूर्ण व्यक्तित्वाचा संगम झाल्याचे येथे दिसून येते.

**७. 'गौराई' स्त्रियांचे सुंदर, तरल व अर्थपूर्ण भावविश्व**

'गौराई'ची सुरुवातही एका प्रसंगाने होते. अंगणात मुलांचा खेळ चाललेला असतो. इरावतीबाईंचे मनही त्यात गुंतलेले असते. ते त्यावर एकीकडे विचार व दुसरीकडे भाष्य करीत राहते. लेखिकेची मुलगी गौरी आपल्या बरोबरीच्या मुलांमध्ये खेळताना त्यांना शिकवत असते, समजूत घालत असते. प्रसंगी त्यांचा कैवार घेऊन पालकांशी भांडत असते. तिच्या बरोबरीच्या मुलांची दादागिरी, रागीटपणा तिच्यापुढे चालत नाही. पण समजुतदारपणे, प्रेमाने ती सर्वांना सांभाळते. लेखिका याप्रसंगी म्हणते, गौराई आमची बाळाई सकरूबा आमचा जावई, मला बायकांचे हे गाणे आठवले. गौरी महाराष्ट्राचे, माहेरवाशिणींचे प्रतीक, तर भोळा शंकर जावयाच्या स्थानी योजलेला. लेखिका निरीक्षणाअंती सांगते की, मुली दिसायला हुशार, हसतमुख, तोंड भरून बोलणाऱ्या आणि मुलगे सगळे संकोची, मागे-मागे राहणारे! लेखिका समाजात पाहते की, सारे भाऊ रडवे, भांडकुदळ, लाडावलेले व बहिणी मात्र लहानपणीच प्रौढासारख्या वागणाऱ्या, भावापुढे नमते घेणाऱ्या, त्यांना जीवापाड सांभाळणाऱ्या, हुशार, चुणचुणीत. हा विरोधाभास लेखिकेचे मन टिपते. गौरीत हे जे सामंजस्य दिसते तेच तिला कामवाल्या गयेच्या ठिकाणी, बजाबाईच्या वृत्तीत व वृद्ध माळीणबाईंच्या स्वभावात आढळते. कामवाल्या गयेला बाळंतपणात खाट हवी असते. परंतु तिचा नवरा खूपच संकोची वृत्तीचा असतो. त्यामुळे त्याच्याकरवी निरोप धाडण्याऐवजी ती स्वतःच ते सांगण्यासाठी लेखिकेच्या घरी येते. बजाबाई ही विधवा स्त्री लेखिकेच्या गावात राहात असे. ती भावांना त्यांच्या कामधंद्यात मदत करी. तिचे भाऊसुद्धा कामसू, देखणे होते. परंतु तिच्यासारखा व्यवहार काही त्यांना जमत नसे. तिची सगळ्या कुटुंबावर हुकूमत, पण ती काही नुसती बसून हुकूम सोडत नसे. तिचा अधिकार कष्टाने, प्रेमाने मिळवलेला असे. लेखिकेची माळीणबाई अगदी म्हातारी झालेली होती.

तिचा नवरा काहीसा भ्रमिष्ट झाला होता. तो तिला फार त्रास देई. भागूने हा वनवास संपण्यासाठी माळीबुवा लवकर गेले तर बरे होईल असे म्हटले. तेव्हा माळीणबाईंनी त्याला अडवले व आपल्या नवऱ्याने कधी काळी आपल्याला सुखाचे दिवस दाखवले हे सांगून नवऱ्यावरील आपले जीवापाड प्रेम व्यक्त केले, अखेर लेखिकेच्या लक्षात येते ते हे की, 'गौराई' ही एक वैशिष्ट्यपूर्ण स्त्रीवृत्ती असून तिचा महाराष्ट्रीय स्त्रियांत प्रकर्षाने आविष्कार होतो. इरावतीबाई याबाबत लिहितात, महाराष्ट्रात फिरता फिरता अशा किती गौराया मी पाहिल्या आहेत! किती कष्ट करतात! किती अधिकार गाजवतात! गौरीचा लाडिकपणा, गौरीचा भोळेपणा, गौरीचा प्रेमळपणा सगळे त्यांच्यात दिसून येते, राकट, प्रेमळ, तापट, रानटी, भावांना सांभाळणाऱ्या, रागीट नवऱ्यांना ताळ्यावर आणणाऱ्या, भोळ्या सदाशिवांच्या डोक्यावर बसलेल्या अशा पार्वत्या सर्व जातीत सर्व महाराष्ट्रभर दिसतात. 'गौराई' या महाराष्ट्रातील वैशिष्ट्यपूर्ण स्त्रीवृत्तीचे दर्शन या लेखात लेखिका घडवते. त्यांच्या या लेखात स्त्रीवादी अभिनिवेष नाही पण स्त्रियांविषयी केलेले चिंतन आहे.

**८. 'एकेश्वरी पंथाचा विजय' समाजातील राजकीय घडामोडींचे चिंतन**

जुन्या नाहीशा झालेल्या किंवा मरू घातलेल्या गोष्टींबद्दल लेखिकेला वाईट वाटत आहे. भोवतालच्या सुशिक्षित जाणत्या लोकांना ह्याची जाणीवसुद्धा नाही. लेखिका मात्र गेलेल्या मूल्याबद्दल अश्रू ढाळीत आहे. लेखिकेला दुःख वाटण्याचे कारण म्हणजे वर्तमानपत्रात आलेली बातमी होय. हिंदुस्थानातील लिबरल (नेमस्त, मवाळ) पक्ष राजकीय पक्ष म्हणून स्वतःच स्वतःला बरखास्त करून टाकणार आहे. हा पक्ष आधी माणुसकी, नंतर जनहित आणि मग पक्षाचे राजकारण अशी वृत्ती ठेवणारा होता. त्यामुळे आता देशाचे काय होणार? अशी चिंता लेखिकेला वाटू लागते. या राजकीय पक्षाविषयी लेखिका सांगते, इंग्रजांच्या घरच्या राजकारणातील लोकशाहीची तत्त्वे नेमस्त पुढाऱ्यांनी खरी आचरणात आणली. त्यांची लोकसेवा पक्षातीत होती. कोणत्याही पक्षाशी केव्हाही लोककल्याणासाठी सहकार्य करण्यास त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. काँग्रेसच्या स्वातंत्र्यसंपादनाच्या मार्गाचा निषेध करूनही प्रत्येक वेळी तुरुंगात गेलेल्या काँग्रेस पक्षीय लोकांसाठी खटपट या लोकांनी केली. सरकारच्या प्रत्येक प्रतिगामी धोरणाचा निषेध त्यांनी न चुकता व्यक्त केला. 'सरकारचे पित्ये', 'हस्तक', 'देशद्रोही' अशा सर्व तऱ्हेच्या शिव्या खाऊनही त्यांनी रागाच्या भरात किंवा सत्तेच्या लालसेने स्वजनद्रोह व लोकशाही तत्त्वांशी द्रोह केला नाही. त्यांचे



राजकारण अभ्यासू वृत्तीचे होते. त्यांचे लिखाण 'बहुजन समाजाच्या वृत्ती थरारून सोडण्यासाठी नसून बहुजन समाजाला शिक्षण देण्यासाठी होते. त्यांनी देशभक्तीचे प्रदर्शन केले नाही. अशा विद्वान, सर्वसंग्राहक वृत्तीच्या माणसांना समाजात स्थान नाही म्हणून लेखिका हळहळते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बेकायदा ठरवला तेव्हा लेखिकेच्या ओळखीच्या लहान मुलाला फार आनंद झाला. पण दुसऱ्या दिवशी त्याच्या दलावर बंदी घातली त्यामुळे तो लहान मुलगा संतापला. म्हणजे बंदी घालणे योग्य की अयोग्य? हा प्रश्नच नव्हता. फक्त आमच्यावर नसावी, इतरांवर असावी हा कटाक्ष होता. लेखिकेच्या लक्षात येते की, स्वातंत्र्यपूर्वकाळात स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पुरुष, स्त्रिया, लहान मुले सारेच स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाले होते. परंतु आता सर्वच राजकीय पक्ष अठरा वर्षांखालील कोवळ्या मुलांना देखील राजकारणात ओढत आहेत.

लेखिका ज्या एकेश्वरी पंथाचा उल्लेख करते ते म्हणजे समाजातील राजकीय पक्ष, ज्यांच्या पक्षप्रमुखाचा आदेश शिरोधार्य मानला जातो. या इलाही इल्लिला, महमद रसूलिल्ला! एकच आहे आणि महंमद त्याचा प्रेषित आहे. हे तत्त्वज्ञान लेखिका येथे उद्धृत करते. ती म्हणते, अल्लाचा प्रेषित जो महंमद त्याचे जो ऐकत नाही तो मरणास योग्य आहे, त्याचा नायनाट झाला पाहिजे. हेच ब्रीदवाक्य आज सर्व पक्षांचे आहे, फक्त 'महमद रसूलिल्ला' हे शब्द घातले म्हणजे झाले! ह्या प्रेषितांच्या विरुद्ध एक शब्द कोणी बोलता कामा नये. त्यांच्या चिन्हांचा कोणी अनादर करता कामा नये. प्रत्येकाने ह्यांपैकी कोणातरी एकाच्या पंथाचे असले पाहिजे. लेखिकेला वाटते की, आधुनिक एकेश्वरीवादामुळे बिचारे शैव व वैष्णवसुद्धा फिके पडतील. एकेश्वरी पंथाप्रमाणे येथे पक्षाच्या पुढाऱ्याला भजले जाते. चौफेर व्यक्तिमत्त्वाची लेखिका मात्र अनेक दैवतवादासाठी परस्परसहिष्णुतेसाठी, माणुसकीसाठी हळहळते.

**९. 'जुळी मुले' वास्तव जीवन आणि महाभारत कालीन जीवन प्रवाहाची चिकित्सा**

वास्तव जीवनातील एखादा प्रसंग वा घटना महाभारतकालीन जीवनसंदर्भात तपासून पाहणे हा इरावतीबाईच्या मनाचा एक विशेष आहे. महाभारतातील कुंतीच्या सौजन्याने माद्रीला जुळी मुले होताच कुंतीचा सवतीमत्सर जागृत झाल्याची कथा इरावतीबाई सांगतात. अश्विनीदेवांचे चिंतन केल्याने माद्रीला जुळी मुले होतात. 'द्वंद्वाचे पाचारण केले म्हणजे दोघांची प्राप्ती होते हे कुंतीच्या लक्षात येताच ती सावध होते, या कथाभागाचे वाचन करताना लेखिकेला युरोपातील

जुन्या गाण्यांतून त्या समाजातील 'व्याभिचारिणीला' जुळी मुले होतात ही रूढ समजूत आठवते. अश्विनी देवांपासून झालेली माद्रीची जुळी मुले व युरोपातील ही रूढ विचारसरणी यांनी प्रभावित लेखिकेच्या विचारमंथनातून अखेर एकपत्नी रामाचा सीतात्याग, महाराज्ञी सीतेचा आत्मत्याग या कधी न उलगडणाऱ्या कोड्यांचा अर्थ उलगडू लागतो. रामाने सीतेला टाकले- लोकापवादावरून टाकले. या घटनेपुढे मान तुकवायला लेखिकेचे मन तयार होत नव्हते. लहानपणी लेखिकेला 'राम' या व्यक्तीबद्दल द्वेष व संताप येई. स्वतःच्या मोठेपणासाठी त्याने आपल्या पत्नीचा बळी दिला असे लेखिकेचे ठाम मत असे. त्यापेक्षा पार्वतीवर मनापासून प्रेम करणारा, राकट, जंगली शंकर पत्करला असे वाटे. मोठेपणी मन संस्कारीत झाले. तेव्हा परित्यक्ता स्त्रियांनी आश्रमात 'सीताकान्तरमरण' अशी घोषणा केली की, लेखिकेच्या मनात विचार डोकावे, खरेच, रामासारख्या माणसांमुळेच तर असले आश्रम भरतात. तेच असल्या संस्थांचे आश्रयदाते. तेव्हा त्यांचे स्मरण योग्यच आहे! कालिदास व भवभूति वाचून लेखिकेला रामाबद्दल वाटणारा संताप कमी झाला, पण त्याची जागा तिरस्काराने घेतली.

जर सीता शुद्ध तर तिला दोन मुले एकाचवेळी झालीच कशी? या कोड्यातून त्याने एक विलक्षण युक्ती योजून आपली सुटका पण करून घेतली. ती कथा लेखिका येथे सांगते. 'वाल्मिकीच्या आश्रमात' सीता बाळंत झाली. तेव्हा तिला एक सुंदर मुलगा झाला. त्याचे नाव लहू. एकदा सीता मुलाला पाळण्यात ठेवून नदीवर धुणे धुवावयास गेली, तेथे तिला एक माकडीण भेटली. तिने सीतेला सांगितले की, पाळण्यात एकट्या मुलाला कोणी इजा करील त्यापेक्षा त्याला स्वतःबरोबरच बाळगावे. हे ऐकून सीता बाळाला घेऊन आली व जवळच त्याला एका दगडावर ठेवून धुणी धुवू लागली. वाल्मिकी घरी परतताच त्यांना पाळण्यात बाळ दिसेना. कोणी श्वापदाने पळवून नेले की काय? अशी शंका त्यांच्या मनात निर्माण झाली. सीतेला हे कळले तर ती प्राणत्याग करील या भीतीने त्यांनी योगबलाने गवतापासून नवा मुलगा उत्पन्न केला. सीता बाळासह परत येताच वाल्मिकींना सर्व घटनेचा उलगडा झाला व त्यांनी तिला नव्या बाळाचापण स्वीकार करायला सांगितला. सीतेचा केवळ एकच मुलगा चक्रवर्ती चिन्हांकित होता कारण दुसरा गवतापासून निर्माण करण्यात आला होता. जुळे होईपर्यंत जी गोष्ट केवळ प्रवादरूपाने होती ती आता निःसंदेह सिद्ध झाली होती व त्यावर सीतेचे लोकविलक्षण भयंकर दिव्य हाच एकमेव उपाय होता. रामाला सीतेचा परत स्वीकार करण्याची इच्छा होती. सीतेचे तर सर्व हृदय राममयच



होती. ऋषींच्या सांगण्यावरून रामाने तिचा स्वीकार केला असता तरी लोकप्रवादाने ताबडतोब परत उचल खाल्ली असती व त्यांच्या सांसारिक जीवनात प्रवादाचा विखार परत भिनला असता. म्हणून सीतेने मुलांचा, प्रियकराचा, राणीपणाचा एका क्षणात त्याग केला. या असामान्य त्यागानेच त्या वेळच्या शास्त्राला खोटे ठरवले व ज्या सीतेला जिवंत राहून उजळ माथ्याने वावरता येणे शक्य नव्हते ती मृत्यूने शुद्धचरित्रा, प्रेममय साध्वी सीता म्हणून भारतात अमर झाली.

**१०. 'स्त्री राज्य' म्हणजे स्त्रियांच्या अस्तित्वाचे सूक्ष्म दर्शन**

ज्यात केवळ स्त्रियाच होत्या अशा कुटुंबाविषयी लेखिका आपला अनुभव सांगते. तिच्या मैत्रिणीचे यजमान परगावी नोकरीला होते. त्यामुळे घरी ती मैत्रीण, तिच्या दोन वन्सं आणि तिची धाकटी बहीण होती. लेकीचे बाळंतपण करायला म्हणून तिची आई आली होती व चार दिवस हवापालट म्हणून आईची आईपण आली होती. घरात पुरुषमाणूस नसल्याने केवळ स्त्रियांचेच राज्य होते.

घरात पुरुष असले की, त्यांच्या अस्तित्वाने सारे घर भरल्यासारखे वाटते. पण त्या घरात बायाच असल्याने सर्व घरात बाईपण भरून राहिलेले दिसते. काही चूक झाली तर गडीमाणसांना त्या स्त्रिया मिळमिळीत ताकीद द्यायच्या. एखाद्या गड्याने फारच आगळिक केली तर त्याला काढण्याबद्दल फार मसलती होत, किती संभाषणे होत आणि शेवटी आप्पासाहेब आले की अगदी त्याला काढून टाकायला सांगायचे असा निर्वाणीचा निर्णय घेतला जाई. पण तो तेवढ्यापुरताच. त्या घरात पाऊल ठेवल्याबरोबर केवळ स्त्रियांच्याच अस्तित्वाची सूक्ष्म प्रतीती येई. उंबरठा ओलांडला की, कोपऱ्यांतच बायकी चपला दिसत. दिवाणखान्यातील बैठकही नेहमी नीटनेटकी असे. दिवसादिवसांत इकडचा लोड तिकडे होत नसे. घरातल्या कुठल्याही खोलीत टापटीप असे. अस्ताव्यस्तपणातही स्त्रीत्वाची जाणीव असे. कुठे आरशाच्या मेजावर कुंकूच सांडलेले असायचे, खोलीत तोंडाला लावायच्या चूर्णाचा मंद सुवास सुटलेला, खुर्चीच्या पाठीवर एखाददुसरे तलम पातळ टाकलेले. पुरुषी कपडे, पुरुषी धांदरटपणा कुठे नाही. मुलांची भांडणे, मारामाऱ्या झाल्या की, या स्त्रिया त्यांच्या गोडगोड आवाजात, कोमल आळवण्या करत असत. लेखिकेची मैत्रीण सायंकाळी तिच्या कुशीत शिरणाऱ्या धाकट्याला चार नीतितत्त्वाच्या गोष्टी सांगत असे. त्याच्या रम्य पितृमुखी चेहऱ्यावर लेखिकेची मैत्रीण मुक्यांचा वर्षाव करून आपल्या सर्व नीतिपाठावर पाणी ओतीत असे. लेखिका म्हणते की, खरे पाहिले तर हे स्त्री राज्य नव्हते. असूया, धुसफूस असंतोष स्पर्धा असे वातावरण येथे नव्हते. येथे सर्वत्र प्रसन्नता होती. सर्व स्त्रिया

एका वैष्णवमूर्तीची निरनिराळ्या रूपाने भक्ती करीत होत्या.... माझ्या सखीचे परगावी असलेले पतीही वैष्णवमूर्तीच होता. स्थायी मूर्ती होती. कर्नाटकांतल्या देवळातून अशा प्रचंड मूर्ती असतात. त्यांना 'दोड्डमूर्ती' म्हणतात. ह्या मूर्तींची लहान आटोपशीर प्रतिकृती 'चिक्कमूर्ती' म्हणून उत्सवासाठी असते ...मुख्य मूर्ती दृष्टिगोचर नव्हती, पण तिच्या लहान - लहान उत्सवमूर्ती या मंदिरात ठिकठिकाणी होत्या. या लेखातून लेखिकेचे सश्रद्ध, चिंतनक्षम व्यक्तिमत्त्व डोळ्यांपुढे येत राहते.

**११. 'मराठ्यांचा मट्टपणा' महाराष्ट्र , मराठी संस्कृती व मराठेपण याविषयीचा आपलेपणा**

मोडेल पण वाकणार नाही या वृत्तीमुळे मराठा अव्यवहारी वाटत असला तरी शेवटी हा मठ्ठपणाच मौलिक असल्याचे लेखिकेने या लेखात सांगितले आहे. लेखाच्या प्रारंभी लेखिका, तुळशीराम व पठाण लाला यांच्यातील भांडणाचा प्रसंग वर्णन करते. दोघांचे जोरात भांडण चाललेले असते. मराठमोळा तुळशीराम जेमतेम पाच फूट उंचीचा व अंगाने काटकुळा होता. लाला मात्र सहा फूट उंचीचा, अंगापिंडाने मजबूत पठाण होता. एका इमारत बांधकामाच्या ठिकाणी दोघेही काम करत. उंचीवर अरुंद फळ्यांवरून सहज इकडून तिकडे जात परांच्या बांधणे, कप्पी बसवणे इ. कामे म्हणजे तुळशीरामच्या हातचा मळ होता. एके दिवशी एका कामकऱ्याचा धक्का लागून तुळशीराम ढकलला जातो व तोल सावरता सावरता त्याचा पाय लालाच्या शेजारी ठेवलेल्या वळकटीवर पडतो. त्यावर क्यों साला, बेवकूफ, तुम क्या अंधे हो?' लाला गुरकावतो. ते सहन न होऊन तुळशीराम लालाचा जीव घ्यायला धावतो. इंजिनिअरसाहेब दोघांचीही समजूत घालतात व दोन दिशांना पाठवतात. तरी जाता जाता लाला 'बेवकूफ मरगट्टे!' असे पुटपुटतो. ते ऐकून तुळशीराम तावातावाने परत येतो व साहेबांच्या पुढे हात नाचवीत म्हणतो, बघ, सायबा कसा माजला आहे बैल! थांब त्याला दाखवलंच पाहिजे, त्याची वळकटीच फेकून देतो समुद्रात. त्या दोघांचे भांडण म्हणजे साहेबांनासुद्धा कुतूहलाचा विषय असे. ही उंदीर-सिंहाची चुरस सर्वांना मोठी मजेची वाटते. दोन-तीन दिवसांनंतर तुळशीराम खरोखर लालाची वळकटी समुद्रात फेकून देतो. लालाने त्याच्या दुलईत पैसे शिवून ठेवलेले असतात. त्यामुळे तो रागाने लालबुंद होतो. मात्र तुळशीराम त्याला हाताने ती वळकटी कुठे टाकली ते दाखवतो. लालाला त्याचे पूर्ण पैसे सुरक्षितपणे परत मिळतात. तुळशीरामला पैशांच्या बाबतीत कळले नाही म्हणून लाला हसू लागतो. पण त्या दिवसापासून लाला परत तुळशीरामच्या वाट्याला जात नाही. लेखिका येथे



म्हणते, बिचारा लालाच काय पण इतर परप्रांतीयांना सुद्धा मराठ्यांच्या वागणुकीचे आश्चर्य वाटते. मराठ्यांना व्यवहारच नाही, हा सिद्धांत तर मी आतापर्यंत पाचपंचवीस वेळा तरी ऐकला असेल. लेखिका असेच आणखी काही प्रसंग सांगते. लेखिकेने स्वतःपाशी असलेल्या पैशात कर्ज घेऊन भर घातली व छान घर बांधले. ते घर एका शेटजींना दाखवत असताना शेटजी लेखिकेला 'तुम्हा मराठ्यांना (महाराष्ट्रीयांना) व्यवहारच कळत नाही', असे म्हणतात. तेव्हा बँकेतल्या पैशांचे व्याज खाण्यापेक्षा स्वतःची झोपडी असणे बरे असे लेखिका त्यांना सांगते.

लेखिकेच्या ओळखीच्या परप्रांतीय संस्थानिकांना वर्षासाठी घर घ्यावयाचे होते. राजेसाहेबांना कळले की, त्या आळीतील पाटीलबुवांनी विहिरीसाठी मोठा वीजेचा पंप लावला होता. पण त्यांनी राजेसाहेबांना वीज देण्यास नकार दिला. मात्र त्यानंतर लगेच त्यांनी एका स्त्रीला भाड्याने घर दिले. तिची शाळकरी मुले असल्याने वीजेची सोयसुद्धा करून दिली. राजेसाहेबांनी हे सर्व पाहून आकांडतांडव केला. पाटीलबुवा व्यवहाराला चतुर होते. पण त्यांनी राजेसाहेबांना वीज देण्यास का नकार दिला याचे रहस्य लेखिकेला नंतर उलगडले. राजेसाहेब मोटारीत बसून राहिले व पाटीलबुवांना मोटारीशेजारी बोलावले. ही ऐट पाटीलबुवांना आवडली नाही. पैसा मिळत असला म्हणजे कसलाही कमीपणा किंवा लाचारी स्वीकारायला हरकत नाही हे व्यापारी धोरण पाटीलबुवांना मान्य नव्हते. लेखिका एकदा लोणावळ्याला आगगाडीतून प्रवास करीत होती. त्यावेळचा किस्सा सांगितला आहे. पारश्याला कुणब्याने टोपलीसहीत जांभळे द्यायला नकार दिला. शेवटी परफडत पारशिणीने ती जांभळे रुमालात घेतली मात्र लेखिकेला मराठे लोकाला कसा वेपार कळत नाही हे पुराण मुंबईपर्यंत ऐकवले. मुंबईला बॉम्बहल्ला होणार या भीतीने मुंबईचे लोक वाटेल ते पैसे देऊन बाहेरगावी घरे व जमिनी घेत असताना एका विधवा स्त्रीने मात्र मला घर नि जमीन विकायची नाही. असे ठणकावून सांगितले. तेव्हा एजंटाने या तिच्या वागणुकीला 'मठ्ठपणा' म्हटले. या लेखात मिळणाऱ्या अर्थपूर्ण सुखद कलाटणीमुळे लेख लक्षात राहतो.

**१२. 'महार आणि महाराष्ट्र' एक अतूट नातेसंबंध**

'महार' या जातीसंबंधाने इरावतीबाईंना वाटणारी आपुलकी, आदर व कुतूहल या संपूर्ण लेखात प्रकटते. पण ती सहानुभूती वा कणव यामध्ये पर्यवसित होऊ न देण्यात इरावतीबाईंचा 'व्यापक' समाजशास्त्रीय दृष्टिकोनच प्रकटतो. महार या जमातीचे रक्त तपासण्याच्या वा त्यांच्या डोक्याची मापे घेण्याच्या निमित्ताने इरावतीबाई त्या जमातीचे मूळ, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये

